सोलापूर **तरुण भारत**

न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. ११ एप्रिल २०२५ | वर्ष - ०४ | अंक १० | पाने : ८ | किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# सप्तश्रृंगी गडावर चेंगराचेंगरी!

## गर्दीचे नियोजन हुकले, पोलिसांची तारांबळ



नाशिक : चैत्रोत्सवानिमित्ताने सप्तशृंगगडावर आदिमायेचे दर्शनासाठी बुधवार रात्रीपासून भाविकांची मोठी गर्दी झाली आहे. मात्र देवीच्या दर्शनासाठी झालेल्या भाविकांच्या गर्दीचे रुपांतर चेंगराचेंगरीमध्ये झाले आहे. आदिमायेचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी झाल्याने गर्दीचे नियोजन चुकले. त्यामुळे पहिल्या पायरीजवळ चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली. यामुळे प्रशासन आणि पोलिस व्यवस्थेची मात्र धावपळ झाल्याचे दिसून आले. भाविकांच्या या गर्दीमुळे मंदिर प्रशासन, पोलिस आणि आपत्ती व्यवस्थापनाची मात्र तारांबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आदिमायेचे दर्शन सुलभ व्हावे म्हणून दर्शनी मार्गात बॅरिकेड्स लावण्यात आले होते. मात्र काही ठिकाणी बॅरिकेड्स तुटल्याने चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली. परिणामी लहान मुले, वयोवृद्धांना त्रास सहन करावा लागला. गर्दीचे नियोजन न झाल्याने भाविकांनी पोलिस आणि सप्तशृंग गड व्यवस्थापन विरोधात नाराजी व्यक्त केली. उत्साही भाविकांनी आदिमायेचा गजर करत 'अंबे माता की जय'च्या घोषणांनी संपूर्ण गड परिसर दुमदुमून टाकला. मात्र भाविकांच्या वाढलेल्या या गर्दीमुळे भवानी चौकातील व्यापाऱ्यांचे व्यवहार ठप्प झाल्याचे दिसून आले.

**सप्तश्रृंगीच्या पहिल्या पायरीजवळच भाविकांची गर्दी**

सप्तश्रृंगी गडावर सध्या चैत्रोत्सव सुरू आहे. गुढीपाडव्यापासून सुरू झालेला हा उत्सव हनुमान जयंतीपर्यंत सुरू असतो. गेल्या दोन ते तीन दिवसांपासून या ठिकाणी राज्यभरातून मोठ्या प्रमाणात भाविक येत आहेत. या गर्दीचे नियोजन करण्यासाठी प्रशासनाने दोन ते तीन बैठका घेतल्या असल्या तरी निर्णयांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी केली जात नाही. त्यामुळे वाढलेल्या गर्दीचे नियोजन करणे आवश्यक असताना प्रशासन कुठेतरी कमी पडतेय का, असे वाटतेय. सप्तश्रृंगीच्या पहिल्या पायरीजवळच भाविकांची मोठी गर्दी झाली. त्या ठिकाणी बॅरिकेड्स लावून गर्दीचे नियोजन करण्याचा प्रयत्न केला गेला.

मात्र गर्दीच एवढी होती की तो प्रयत्न अयशस्वी झाला. या ठिकाणी दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची एक लाईन आणि दर्शन घेऊन येणाऱ्या भाविकांची दुसरी लाईन करणे आवश्यक होते. तसेच बाजूच्या दुकानांच्या गर्दीसाठीही वेगळे नियोजन करणे आवश्यक होते. पण तसे काहीच झाले नसल्याने या ठिकाणी चेंगराचेंगरीची परिस्थिती उद्भवल्याचे सांगितले जात आहे.

# छगन भुजबळ नाराज; म्हणाले, मी फक्त आमदार, उपोषण करायला मोकळा!



पुणे : महात्मा फुले वाड्याच्या कामासाठी मला उपोषण करावं लागेल, कारण मी फक्त सरकारमधील घटक पक्षाचा आमदार आहे, असे विधान करत अजित पवार गटाचे आमदार छगन भुजबळ यांनी आज आपल्या नाराजीचा स्पष्ट सूर लावला. पुण्यात फुलेवाड्याच्या कामाची पाहणी करण्यासाठी आलेल्या भुजबळांनी यावेळी मंत्रिमंडळात डावलल्याबाबत अप्रत्यक्षपणे नाराजी व्यक्त केली.

विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर राज्य सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार झाला. या मंत्रिमंडळामध्ये छगन भुजबळांना डावलण्यात आल्याने भुजबळ नाराज असल्याच्या चर्चांना उधाण आले. राज्य मंत्रिमंडळ विस्तारात भुजबळांना स्थान न मिळाल्याने त्यांचं नाराज असणं, यावर अनेक तर्क-वितर्क सुरू होते. मात्र आज त्यांच्या थेट वक्तव्यामुळे ही नाराजी उघड झाली आहे.

महात्मा फुले वाड्याच्या रखडलेल्या कामावर बोलताना भुजबळ म्हणाले, या ऐतिहासिक वाड्याचे काम १०० ते २०० कोटींचे आहे. अनेक वर्षांपासून प्रयत्न करत असलो तरी काहीही प्रगती झालेली नाही. तसेच, ही जागा देशाला अर्पण झाली आहे. येथे येणाऱ्या लोकांसाठी सुविधा नाहीत. सभा घेण्यासाठीही जागा नाही. तरीही अधिकाऱ्यांकडून फक्त टोलवाटोलवी होत आहे, असे ताशेरे ओढत त्यांनी आंदोलनाचा इशाराही दिला.

मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री सकारात्मक असले तरी पालिका अधिकारी जमिनीच्या अधिग्रहणाबाबत निष्क्रिय आहेत. जागा ताब्यात घेण्याचा वेग शून्य आहे, अशी थेट टीकाही त्यांनी केली.

दरम्यान, फुलेवाड्यावर आधारित येणाऱ्या हिंदी चित्रपटावर झालेल्या वादावर बोलताना भुजबळ म्हणाले, चित्रपट निर्मात्यांनी माझी भेट घेतली होती. त्यांनी विविध पुस्तकांच्या आधारे चित्रपट तयार केला असून कोणतीही इतिहासाशी छेडछाड केलेली नाही. आक्षेप असल्यास आम्ही पुरावे सादर करू, असे ते म्हणाले.

# वारीत गर्दीच्या व्यवस्थापनासाठी एआय तंत्रज्ञानाची मदत



सोलापूर : पंढरपूर महाराष्ट्राचे आराध्यदैवत व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक येतात. तसेच आषाढी, कार्तिकी, चैत्री, माघी या चार प्रमुख यात्रेला लाखो भाविक पंढरीत येतात. या यात्रा कालावधीत पंढरपूर शहरात प्रामुख्याने चंद्रभागा वाळवंट, नदीपात्र , भक्ती सागर परिसर, मंदिर परिसर, दर्शन रांग , प्रदक्षिणा मार्ग, शहरातील रस्ते या भागात वारकरी- भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. या गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी आता कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय तंत्रज्ञानाचा वापर होणार असून, एआय तंत्रज्ञान वापराबाबतची चाचणी पंढरपूर बसस्थानक येथून घेण्यात आली.

वारीत गर्दीच्या व्यवस्थापनासाठी वापरण्यात येणाऱ्या एआय तंत्रज्ञानाची चाचणी पंढरपूर येथील बसस्थानक येथून घेण्यात आली. यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, प्रशिक्षित आय.पी.एस अधिकारी अंजना कृष्णन, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, विक्रांत गायकवाड, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, ड्रोन आयडीया फोर्चचे एजीएम आशिष माथूर उपस्थित होते.

श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी वर्षाकाठी पंढरपूरात एक कोटीहून अधिक भाविक येत असतात. आषाढी यात्राकाळात मानांच्या पालख्यांसह अनेक दिंड्या पायी पंढरपूरला येत असतात.

# तहव्वूर राणाला भारतात आणले, तिहारमध्ये ठेवणार; NIA 26/11 प्रकरणी चौकशी करणार

नवी दिल्ली : अमेरिकेने तहव्वूर राणाला भारताकडे हस्तांतरित केले आहे. मुंबईत २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या अतिरेकी हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणा याला विशेष विमानाने दिल्लीत आणण्यात आले. तहव्वूर राणाला दिल्लीच्या तिहार तुरुंगात ठेवले जाणार आहे. तिथेच त्याची एनआयएचे अधिकारी कसून चौकशी करणार आहेत. या चौकशीचे नेतृत्व आयपीएसच्या महाराष्ट्र कॅडरचे १९९० च्या बॅचचे अधिकारी सदानंद दाते करणार आहेत.

मुंबईत २००८ मध्ये जेव्हा २६/११ चा अतिरेकी हल्ला झाला त्यावेळी सदानंद दाते अतिरेक्यांच्या विरोधात काम करणाऱ्या एटीएसची जबाबदारी हाताळत होते. त्यांनी कामा रुग्णालयात अतिरेक्यांशी झुंज दिली होती. यामुळे दातेंसाठी तहव्वूर राणाची चौकशी करण्याच्या निमित्ताने २६/११ च्या पीडितांना न्याय देण्याची आणखी एक संधी आहे.

भारतीय न्यायालयात तहव्वूर राणा विरोधात खटला चालवला जाणार आहे. या खटल्यात दोषी आढळल्यास तहव्वूर राणाला कठोरात कठोर शिक्षा दिली जाण्याची शक्यता आहे. तहव्वूर राणाशी संबंधित सर्व खटल्यांसाठी एनआयएकडून नरेंद्र मान यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या संदर्भातली अधिसूचना काढण्यात आली आहे.

भारताकडे हस्तांतरण होऊ नये यासाठी तहव्वूर राणाने अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती. ही याचिका फेटाळण्यात आली आहे. याआधी मार्चमध्येही त्याने केलेली याचिका फेटाळण्यात आली होती. यानंतर तहव्वूर राणाला भारतात आणण्याची कारवाई सुरू झाली. या कारवाईवर स्थगिती आणण्यासाठी अखेरचा प्रयत्न म्हणून तहव्वूर राणाने अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती. पण त्याची स्थगितीची मागणी फेटाळण्यात आली. एबडोमिनल ऑर्टिक एन्युरिझम, पार्किंसन आणि मूत्राशयाच्या कर्करोग असे तीन गंभीर आजार झाल्याचे कारण देत तहव्वूर राणाने अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. भारताकडे हस्तांतरित करण्याची कारवाई स्थगित करावी, अशी मागणी त्याने केली होती. पण अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने तहव्वूर राणाची स्थगितीची मागणी फेटाळली. या निर्णयामुळे तहव्वूर राणाला भारतात आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

फेब्रुवारीत पंतप्रधान मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट झाली होती. या भेटीनंतर घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत तहव्वूर राणाला भारताकडे हस्तांतरित करण्याचे संकेत अमेरिकेने दिले होते. तहव्वूर राणा हा पाकिस्तानी-अमेरिकन अतिरेकी डेव्हिड कोलमन हेडलीचा सहकारी आहे, जो २००८ मध्ये मुंबईवर झालेल्या २६ नोव्हेंबरच्या हल्ल्यातील प्रमुख सूत्रधारांपैकी एक होता. तो पाकिस्तानी वंशाचा व्यापारी, डॉक्टर आणि इमिग्रेशन उद्योजक आहे. त्याचे लष्कर-ए-तोयबा या अतिरेकी संघटनेशी तसेच पाकिस्तानची गुप्तहेर संघटना आयएसआयशी संबंध असल्याचे समजते.

अमेरिकेच्या ज्युरीने राणाला हल्ल्यांना भौतिक मदत पुरवल्याच्या आरोपातून ठोस पुराव्यांअभावी मुक्त केले होते. पण त्याला इतर दोन आरोपांमध्ये दोषी ठरवण्यात आले होते. तहव्वूर राणाला दहा वर्षांपेक्षा जास्त कालावधीची तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली होती. कोविड काळात तब्येत बिघडू लागल्याचे पाहून त्याला तुरुंगातून सोडण्यात आले. नंतर भारताच्या ताब्यात देण्यासाठी अमेरिकेने तहव्वूर राणाला पुन्हा अटक केली. राणाने भारताच्या ताब्यात दिले जाऊ नये यासाठी कायदेशीर प्रयत्न केले. पण अमेरिकेच्या न्यायालयाने त्याची भारताच्या ताब्यात देऊ नये ही मागणी फेटाळून लावली.

# 'आपले सरकार' पोर्टल १४ एप्रिलपर्यंत बंद


मुंबई : नागरिकांना पारदर्शक आणि कार्यक्षम सेवा देण्यासाठी सुरू केलेले 'आपले सरकार' पोर्टल १४ एप्रिलपर्यंत बंद राहणार आहे. आधुनिकीकरणाचे काम करायचे असल्यामुळे पोर्टल १४ एप्रिलपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे कोणतेही शासकीय ऑनलाईन काम १४ एप्रिलपर्यंत 'आपले सरकार' पोर्टलद्वारे करता येणार नाही.

शासनाच्या विविध सेवा पारदर्शक पद्धतीने आणि जलदगतीने उपलब्ध व्हाव्यात, कामकाज कार्यक्षम व्हावे, या हेतूने फडणवीस सरकारने 'आपले सरकार' पोर्टल १० वर्षांपूर्वी सुरू केले. या पोर्टलद्वारे जलदगतीने सेवा मिळतात. वेगवेगळी प्रमाणपत्र ऑनलाईन पटकन मिळतात. कार्यालयात जाण्याचा, रांगेत उभे राहण्याचा त्रास वाचतो. वेळ आणि पैसा यांची बचत होते. आधार कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना, ओळख पुरावा, नरेगा जॉब कार्ड, पॅनकार्ड, पासपोर्ट, मतदार ओळखपत्र अशी अनेक कागदपत्रे 'आपले सरकार' पोर्टलद्वारे लवकर मिळवता येतात.

शासनाच्या वेगवेगळ्या विभागांशी संबंधित अनेक सेवा 'आपले सरकार' पोर्टलद्वारे उपलब्ध असल्यामुळे सामान्यांचे काम सोपे होते. यामुळे असंख्य नागरिक 'आपले सरकार' पोर्टलचा वापर करतात. मागील काही वर्षात विश्वासार्ह, वेगवान, सुरक्षित आणि पारदर्शक सेवेमुळे 'आपले सरकार' पोर्टल लोकप्रिय झाले आहे.

सध्या राज्यातील ३८ विभागांच्या ४८५ सेवा 'आपले सरकार' पोर्टलवर आहेत. नागरिकांना या सेवा घरबसल्या मिळवता येत आहेत. सरकारी आकडेवारीनुसार, २०१५ पासून आपले सरकार डिजिटल प्लॅटफॉर्मवर आतापर्यंत एकूण १७ कोटी ६३ लाख ६२ हजार ४६८ अर्ज प्राप्त झाले होते. त्यातील १६ कोटी ६१ लाख ३ हजार ९०९ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकूण १ कोटी ६६ लाख २३ हजार २७५ अर्ज आले होते.

# गुजरातमध्ये दूषित पाण्यामुळे ११० जण रुग्णालयात



सुरत : गुजरातच्या सुरतमध्ये दूषित पाणी पिल्याने ११० कामगारांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. गुजरातमधील सुरत येथील एका डायमंड युनिटमध्ये दूषित पाणी प्यायल्याचा संशय आल्यानंतर ११० कामगारांना रुग्णालयात दाखल करावे लागले.

कामगारांनी परिसरात बसवलेल्या कूलरमधील पाणी प्यायले होते, ज्यामध्ये कीटकनाशके असल्याचा संशय होता. याबाबत पोलिस उपायुक्त (डीसीपी) आलोक कुमार म्हणाले की, कपोदरा परिसरातील मिलेनियम कॉम्प्लेक्समध्ये असलेल्या अन्भव जेम्सच्या कामगारांना खबरदारीचा उपाय म्हणून युनिट मालकाने वैद्यकीय तपासणीसाठी २ वेगवेगळ्या रुग्णालयात नेले. कोणत्याही कामगारांना विषबाधेशी संबंधित कोणताही आजार नाही परंतु त्यांना रुग्णालयात निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आहे.

कुमार म्हणाले की, कूलरच्या पाण्यात कीटकनाशकांनी भरलेली फाटलेली प्लास्टिकची पिशवी आढळली. तथापि, ज्या कागदी पिशवीत प्लास्टिकची पिशवी ठेवली होती ती शाबूत होती. ती कागदी पिशवी असल्याने, काही प्रमाणात कीटकनाशक पाण्यात शिरले असावे अशी भीती होती, याप्रकरणी तपासाच्या आधारे गुन्हा दाखल केला जाईल आणि कठोर कारवाई केली जाईल, असे डीसीपी अलोक कुमार यांनी सांगितले.

# नव्या वक्फ कायद्यावरून पश्चिम बंगाल हिंसाचार प्रकरणी २२ जणांना अटक

कोलकाता : पश्चिम बंगालच्या मुस्लिमबहुल मुर्शिदाबाद जिल्ह्यात वक्फ (दुरुस्ती) कायद्याच्या विरोधात झालेल्या निदर्शनादरम्यान झालेल्या हिंसाचार प्रकरणी २२ जणांना अटक करण्यात आली आहे. दरम्यान सध्या परिस्थिती शांत आणि नियंत्रणात असल्याचे वरिष्ठ पोलिस धिकाऱ्यांनी सांगितले.

वक्फ सुधारणा कायद्याच्या विरोधात पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबादमध्ये ८ एप्रिल रोजी झालेल्या हिंसाचारप्रकरणी पोलिसांनी २२ जणांना अटक केली आहे. यापैकी ८ आरोपींना पुढील तपासासाठी पोलिस कोठडीत पाठवण्यात आले आहे. याबाबत जांगीपूरचे पोलिस अधीक्षक (एसपी) आनंद रॉय म्हणाले की, पोलिसांनी हिंसाचाराची स्वतःहून दखल घेतली आहे आणि गुन्हा दाखल केला आहे.

गेल्या ८ एप्रिल रोजी वक्फ सुधारणा कायद्याच्या निषेधार्थ मुस्लिम समाजकंटकांनी अनेक वाहनांना आग लावली होती. यामध्ये पोलिसांच्या वाहनांचाही समावेश होता. या संघर्षादरम्यान निदर्शकांनी दगडफेकही केली, ज्यामुळे अनेक पोलिस जखमी झाले. दरम्यान वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर झाल्यापासून, सर्वोच्च न्यायालयात आतापर्यंत १२ याचिका दाखल झाल्या आहेत. आगामी १६ एप्रिल रोजी न्यायालय १० याचिकांवर सुनावणी करणार आहे. त्याच वेळी, ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड देशभरात निषेध करणार आहे.

# २५ साल बेमिसाल या टॅग लाईन अंतर्गत भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव साजरा

## जैन समाज बांधवच नव्हे तर शहरातील सर्व समाज बांधवांनी मिरवणुकीत सहभाग नोंदवुन एकात्मतेचे आणि आपुलकीचे दर्शन घडविले



छत्रपती संभाजीनगर: समस्त विश्वाला सत्य व अहिंसा, करुणा व जिओ और जिने दो... असे मानव कल्याणकारी संदेश देणारे भगवान महावीर यांच्या जन्मकल्याणक महोत्सवानिमिताने शहरात मोठा उत्साह आहे. सकल जैन समाजाच्या वतीने आज शहरात सामाजिक संदेश देत पैठण गेट येथून भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी ढोल, बँड पथकांच्या गजरात भगवान महावीर यांचा जयघोष करण्यात आला. यावेळी महावीर बोलो स्वामी महावीर बोलो...! अशा गजराने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाहून निघाला. यावेळी केवळ जैन समाज बांधवच नव्हे तर शहरातील सर्व समाज बांधवांनी मिरवणुकीत सहभाग नोंदवुन एकात्मतेचे आणि आपुलकीचे दर्शन घडविले.

भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सवाच्या निमित्ताने आज सकाळी सकल जैन समाजाच्या वतीने भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव समितीच्या वतीने सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक कार्यक्रम घेऊन आज सकाळपासूनच भगवान महावीर यांचा जन्मकल्याणक महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. आज सकाळी २५ साल बेमिसाल या टॅग लाईन अंर्तगत भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी आज सकाळी ध्वजारोहण करून पैठण गेट येथे वाजत गाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मंत्री अतुल सावे, सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाठ, खा. संदीपान भुमरे, माजी खा. चंद्रकांत खैरे, माजी महापौर नंदकुमार घोडेले, पृथ्वीराज पवार, रशीद मामू, राजेंद्रसिंग जबिंदा, प्रशांत देसरडा, विकास जैन, पोलीस उपायुक्त नितीन बगाटे, पोलीस निरीक्षक निर्मला परदेशी, सहाय्यक पोलीस आयुक्त संपत शिंदे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष संजय कांकरिया, अजय शहा, शिवशंकर स्वामी, लक्ष्मीनारायण राठी, सरदार हरिसिंग, जयंत देवळाणकर, अजय मंत्री, विजय जैस्वाल, पंकज लोया, सुभाष शेळके, महावीर पाटणी, स्वप्नील पारख, प्रकाश झांबड, अनिलकुमार संचेती, कौशीक सुराणा, रवी मुगदिया, विलास साहुजी नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल, प्रशांत शहा, अभिजित हिरप आदी उपस्थित होते. यावेळी वाजत गाजत पैठण गेट मार्गे मिरवणूक निघाली. यावेळी मिरवणुकीत दहा रथ, सामाजिक संदेश देणारे देखावे, बैलगाडी, बँड पथक, ढोल पथकाच्या गजरात मिरवणूक गुलमंडी मार्गे काढण्यात आली. यावेळी ऐतिहासिक मंगलपाठ करण्यात आला. यावेळी वर्धमान नागरी पतसंस्थेच्या वतीने हातात झाडू घेत स्वच्छता करत स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. संपुर्ण कार्यक्रमासाठी महासचिव महावीर पाटणी, विकास जैन, प्रशांत देसरडा, झुंबरलाल पगारिया, अनिलकुमार संचेती, कौशीक सुराणा, मुकेश साहुजी, अमोल पुर्णेकर, रतिलाल मुगदिया, ॲड.डी.बी.कासलीवाल, डॉ.प्रकाश झांबड, विलास साहुजी, संजय संचेती, रवि मुगदिया, मदनलाल आच्छा, वृषभ कासलीवाल, विनोद बोकडिया, निलेश सावलकर, भारती बागरेचा, राजेश मुथा, निलेश पहाडे, करूणा साहुजी, भावना सेठीया, मंगल पारख, कविता अजमेरा, मधु जैन, मेघा सुगंधी, प्रकाश अजमेरा, इंदरचंद संचेती, महेंद्र जैन, रूपराज सुराणा, आनंद दुग्गड, हर्षल साहुजी, प्रफुल्ल सोनटक्के, चादमल सुराना सजय पापडीवाल नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल, प्रशांत शहा यांच्यासह सकल जैन समाज बांधवांनी परिश्रम घेतले.

# अमेरिका - चीनच्या टॅरिफ युद्धात स्मार्टफोन स्वस्त होण्याची शक्यता

नवी दिल्ली : अमेरिकेने चिनी मालावर १२५ टक्के आणि चीनने अमेरिकेच्या मालावर ८४ टक्के टॅरिफ लागू केला आहे. अमेरिका आणि चीन यांच्यात टॅरिफ युद्ध सुरू झाले आहे. चीनसाठी अमेरिकेत माल विकणे कठीण झाले आहे. या परिस्थितीत मोठी बाजारपेठ म्हणून चीन फक्त भारततचाच विचार करू शकतो. भारताची लोकसंख्या १४६ कोटींपेक्षा जास्त आहे. यात मध्यमवर्गीयांचे आणि तरुण पिढीचे प्रमाण मोठे आहे. यामुळे चीनसाठी भारत हीच आता मोठी आणि सक्षम बाजारपेठ आहे. ही बाजारपेठ बळकावण्यासाठी चीन सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांना पुढील काही महिने भारतात स्वस्तात विकण्याची शक्यता आहे. यामुळे भारतात स्मार्टफोन, स्मार्ट फ्रीज, स्मार्ट टीव्ही यांच्यासह अनेक इलेक्ट्रॉनिक वस्तू पुढील काही महिने भारतात स्वस्तात मिळण्याची शक्यता आहे.




# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महसूल अधिकारी हस्तपुस्तिकेचे प्रकाशन

## हस्तपुस्तिका निर्मितीत जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांचे महत्त्वाचे योगदान

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

महसूल विभागाची रचना,महसूल विभागाचे अधिकार, महसूल शाखा, तगाई कायदा, गृहशाखा, लेखा विभाग, पूरवठा विभाग,गौण खनिज,राज शिष्टाचार शाखा,आपत्ती व्यवस्थापन, पूनर्वसन, भूसंपादन प्रक्रिया, ग्राम पंचायत निवडणूक, रोजगार हमी योजना,म.न.रे.गा.,संजय गांधी योजना, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी यांचे अधिकार आणि कर्तव्ये, तहसिलदार यांची अधिकार आणि कर्तव्ये ,जिल्हायधिकारी यांची जिल्हा स्तरा-वरील विविध समित्यांचे सचिव म्हणून भूमिका, जिल्हा नियोजन आराखडा,यासह अन्य महसूल विषयक महत्वाच्या बाबीची नोंद असलेल्या हस्तपुस्तिकेचे प्रकाशन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांचे हस्ते् यशदा पुणे या ठिकाणी पार पडले.

या प्रसंगी हस्तपुस्तिकेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कौतुक केले व महसूल विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी ही हस्तपुस्तिका महत्वाची भुमिका



बजावेल असे ते म्हणाले. महसूल विभागातील अधिकारी यांच्याा मार्गदर्शनासाठी विभागीय आयुक्त ,कोकण विभाग,विजय सुर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली महसूल विभागाची हस्तपुस्तिका तयार करण्यात आली. सदरील हस्तपुस्तिका तयार करण्यासाठी जिल्हाधिकारी,जालना डॉ.श्रीकृष्ण पांचाळ,जिल्हाधिकारी,जळगाव आयुष प्रसाद,जिल्हाधिकारी नांदेड,राहूल कर्डिले, जिल्ह्धिकारी अहिल्यानगर, डॉ.पंकज अशिया,जिल्हाधिकारी चंद्रपूर,विनय गोवडा यांनी महत्वाची भूमिका बजावली. सदरील हस्तपु-स्तिका निर्मितीत जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी मोलाची भुमिका बजावली. यावेळी बोलतांना डॉ.श्रीकृष्ण पांचाळ म्हणाले की,सदरील हस्तपुस्तिका ए.आय.तंत्रज्ञानाचा वापर करुन तयार करण्यात आली आहे. या हस्तपुस्तिकेत महाराष्ट्रातील महसूल विभागाची रचना,विभागीय आयुक्त ,जिल्हा धिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी,उप विभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी,तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचे अधिकार व कर्तव्य तसेच संदर्भासाठी प्रशासकीय कामकाज पार पाडतांना आजपर्यत महसूल विभागात न्यायालयाने दिलेल्या महत्वाच्या न्यायालयीन निकालाचा तपशीलाचा समावेश आहे.

या हस्तपुस्तिकेत महसूल विभागातील सर्व आस्थापना अंतर्गत केले जाणारे कामकाज जसे की, विविध योजना,संबंधित योजने विषयी आवश्यक माहिती,आवश्यक दस्ताऐवज ,कार्यपध्दाती,कायदेशीर तरतूदी यासह अन्य बाबीचा यात समावेश केलेला आहे.

# संक्षिप्त

## राहुल नार्वेकरांकडून आ.अर्जुन खोतकर यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष मा. श्री.राहुल नार्वेकर यांची आ.अर्जुनराव खोतकर यांनी ०८/०४/२०२५/ रोजी विधिमंडळात सदिच्छा भेट घेतली यावेळी विधिमंडळ अंदाज समिती प्रमुख पदी निवड झाल्याबद्दल आ. अर्जुनराव खोतकर यांचा पुष्प-गुच्छ देऊन विधीसभा अध्यक्ष नार्वेकर सत्कार केला व आपणास समीतीच्या कार्यास पुर्णपणे सहकार्य केले जाईल असे सांगुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## दुधनात पुन्हा कैणीच्या सह्याने अवैध वाळु उपसा सुरू!

तभा वृत्तसेवा
परतुर/प्रतिनिधी

तहसिलदार मॅडम दुधना नदी पात्रात चार चार केणी द्वारे वाळू उपसा तरी आपण शांत का ? परतुर तालुक्याला लाभलेल्या कर्तबगार महिला तहसिलदार गोरे मॅडम नुकताच तुम्ही मुरूम माफियांना पळो कि सळो करत आपल्या कर्तबगारीने गौन खनिज माफियांत दहशद निर्माण केली मात्र परतुर तालुक्यातील दुधना नदि पात्राचे दिवसेंदिवस पाणी आटत आसल्याने भुरट्या वाळू माफियांनी अवैधरित्या वाळु करण्याचा जणु सपाटाच लावलाय मौजे कोरेगाव तसेच रोहीणा शिवारातील दुधना नदी पात्रात गेल्या एक हप्त्यापासुन वाळू माफीयांनी केणीच्या सहाय्याने वाळु उपस्याचा सपाटा लावला आहे तरी महसुल विभागाला याची जणू भनक नाही . हा सर्वसामान्य माणसाला पडलेला पश्न आहे . तरी एखाद्या व्यक्तीकडुण गोपनीय माहिती आपणास दिली तर लगेचच ति माहिती माफीयांना कशी मिळते हा एक मोठा प्रश्न निर्माण झाला आहे . संबंधीत गावातील तलाठी तथा मंडळअधिकरी या प्रकाराकडे जाणून बुजुन दुर्लक्ष करतात . त्यामुळे यांच्याकडे सर्वसामान्य माणसा चा बघण्याचा दृष्टिकोन बदलेला आहे तरी आपण तात्काळ संबंधीत ठिकणच्या दुधना नदी पात्रातील अवैधरित्या वाळु उपसा करणाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे .

## बदनापूर तालुक्यातील कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी (अजित पवार) मध्ये प्रवेश



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

बदनापूर तालुक्यातील सोमठाणा, धामणगाव, निकळक- अकोला, खडकवाडी, सिरसगाव घाटी, गेवराई बाजार , मालेवाडी व सागरवाडी येथील वेगवेगळ्या पक्षातील कार्यकर्त्यांनी आज दिनांक ६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष व बदनापूरचे माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी जाहीर प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे बदनापूर तालुकाध्यक्ष कैलास मदन, बदनापूर शहराध्यक्ष इम्रानभाई, जालना तालुका अध्यक्ष संतोष ढेंगळे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी सोमठाणा येथील सरपंच तथा विकासो चेअरमन रामकिसन मेंढरे, धामणगांव येथील त्रिंबक आढे,लक्ष्मण नरवडे, अकोला- निकळक विकासोचे चेअरमन फैसल चाऊस, माजी सरपंच बद्रीनाथ सानप, खडकवाडीचे सरपंच विठ्ठल जोनवाळ, सांडू शेजुळ, संतोष कान्हेरे, शिवाजी कडोस, नारायण ब्राह्मणे, शामसिंग जारवाल यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी यावेळी राष्ट्रवादी मध्ये प्रवेश केला. तालुकाध्यक्ष कैलास मदन यांनी सर्वांचे स्वागत करून अभिनंदन केले. बदनापूर तालुक्यात पक्ष वाढीसाठी सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले. जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण की , याच कार्यकर्त्यांच्या मदतीने मी बदनापूर मतदार संघाचा आमदार झालो होतो पुन्हा तेच कार्यकर्ते स्वगृही आल्याने मनापासून आनंद झाला. पुन्हा आपल्या सोबत आल्याने जुन्या नव्या कार्यकर्त्यांच्या मदतीने बदनापूर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे काम जोमाने करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# माऊली अर्बन परिवार आपल्या कार्याच्या माध्यमातून करायचा ठसा उमटण्याची काम करतो -माधुरी देशमुख

## माऊली अर्बन परिवारातर्फे बसस्थानकात आरो प्लांटचे लोकार्पण

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

माऊली अर्बन परिवार आपल्या कार्याच्या माध्यमातून कार्याकरण्यचा ठसा उमटण्याची काम करतो-माधुरी देशमुख आग्राप्रमुख परतुर माऊली अर्बन परिवारातर्फे आज (ता.९) बुधवार रोजी बसस्थानकात कायमस्वरूपी आरोप्लांटचे लोकार्पण परतुर येथील आग्राप्रमुख माधुरी देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय जनता पार्टी तालुकाध्यक्ष सतीश निर्वळ मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नागेश कुलकर्णी पत्रकार राजेश भुतेकर,रविंद्र भावसार, आशिष तिवारी सह वाघमारे न्युज पेपर एजन्सी चे संचालक वसंतराव वाघमारे यांची प्रमुख उप-स्थिती होती.

या लोक अर्पण सोहळ्याच्या उद्घाटन प्रसंगी पुढे बोलताना माधुरी देशमुख म्हणाले की



माऊली अर्बन परिवार समाजाला काही देण्याच्या माध्यमातून सतत सामाजिक उपक्रम राबवितात. दरवर्षी माऊली अर्बन परिवारातर्फे प्रवाशांचे हाल लक्षात घेत बस स्थानकात उन्हाळ्यात दररोज ५० ते ७० जारची व्यवस्था करतात मात्र प्रवाशांना पिण्यासाठी कायमस्वरूपी शुद्ध आरोचे पाणी मिळावे यासाठी बसस्थानकास कायमस्वरूपी आरो प्लांट भेट देऊन प्रवाशासह वाहक पालकांचा शुद्ध पाणी पिण्याचा प्रश्न त्यांनी मार्गी लावून एक आगळा वेगळा उपक्रम राबविला आहे. यावेळी माऊली अर्बन परिवाराचे माऊली खरात,गजानन निर्वळ,अमोल मस्के, कालिदास निर्वळ रवी चव्हाण, रामकिसन, इकर प्रभाकर कदम, हनुमान बोने,महेश आवचार,लखन रामपूरकर,शुभम घाडगे,सुनील उदावंत, दिगंबर बादाडे,भीम चव्हाण आदींची उपस्थिती होती.

# डॉ.सोनाली परमेश्वर राठोड (चव्हाण) यांना पीएच.डी.पदवी प्रदान

तभा वृत्तसेवा
परतूर/प्रतिनिधी



मौजे हास्तुर तांडा ता.परतूर जिल्हा. जालना : येथील गाव-ातील प्रथम महिला ग्रामपंचायत मेंबर प्रा. सोनाली परमेश्वर राठोड यांना आर. एन. टी. यू. विद्यापीठ (मध्यप्रदेश) व्यवस्थापक विभागातील (रपररसशाशपीं) पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यानिमित्ताने विद्यापीठ आयोजित दीक्षांत समारोह मध्ये त्यांचा सत्कार करून गौरविण्यात आले. या समारोह प्रसंगी म.प्र. राज्याचे उपमुख्यमंत्री माननीय श्री राजेंद्र शुक्ला जी व म.प्र. राज्याचे परिवहन तथा शालेय शिक्षण मंत्री माननीय श्री उदय प्रताप जी सिंह यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार सोहळा पार पडला. डॉ.सोनाली परमेश्वर राठोड (चव्हाण) ह्या पी.एच.डी. पदवी मिळवणारे, गावातील पहिलिच महिला आहेत. त्यांचा व्यवस्थापन विभागामध्ये विश्लेषणात्मक अभ्यास असा विषय होता त्यांनी सदर विषयामध्ये पी.एच डि. प्राप्त केली त्यांना भोपाळ येथील डॉ.पूजा चतुर्वेदी यांनी मार्गदर्शन केले. डॉ.संगीता जोहरी यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. डॉ.अतुल लुंबा व डॉ.ज्योत्स्ना मिश्रा यांनी संयोजन केले. तर विद्यापीठाचे कुलगुरू माननीय श्री संतोष चौबे यांनी सर्वांचे अभिनंदन केले व आभार मानून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## वाळू धोरणात बदल करण्यासंदर्भात आ.बबनराव लोणीकर यांच्या मागणीला यश

# राज्यात नवीन वाळू धोरण लागू

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी



मुंबई व नागपूर येथे झालेल्या अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना देण्यात आलेल्या पत्रामध्ये वाळू धोरणात बदल करण्यात यावा अशी मागणी केली होती त्या मागणीला यश आले असून राज्य सरकारचे नवीन वाळू धोरण जाहीर करण्यात आले आहे. वाळू धोरणात पारदर्शकता असणे आवश्यक आहे ही बाब लोकप्रतिनिधी म्हणून विविध अधिवेशनांमध्ये मांडलेले आहे यावेळी महाराष्ट्र सरकारने वाळूचे धोरण बदलावे या संदर्भात मागणी करत तेलंगणा व आंध्र प्रदेशच्या धर्तीवर वाळू धोरणात बदल करण्यात यावा अशी मागणी देखील करण्यात आली होती. तेलंगणा व आंध्र प्रदेशच्या वाळू धोरणानुसार गौण खनिज चोरी रोखण्यात संबंधित सरकारला यश आले आहे या ठिकाणी सर्व प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीची असून १ ब्रास देखील चोरी करता येत नाही अशी व्यवस्था करण्यात आली आहे शासकीय कामकाजासाठी या ठिकाणी मुबलक प्रमाणात घेऊन खनिज उपलब्ध असून या धोरणाचा स्वीकार केल्यास १० पटीने शासनाचा महसूल वाढ होण्यास मदत होईल व महसूल आणि पोलीस प्रशासन यांच्यावरील कामाचा भार देखील कमी होण्यास मदत होईल असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले. राज्याच्या वाळू धोरणात असलेले दोष व त्रुटी आमदार लोणीकर यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर शासनाच्या वतीने नवीन वाळू धोरण घोषित करण्यात आले आहे त्याबद्दल माजीमंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले आहेत.

मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नव्या वाळू धोरणास मंजुरी देण्यात आली. फेब्रुवारी २०२४ पासून राज्यात वाळू डेपो धोरण राबविण्यात येत होते. या धोरणांतर्गत शासनामार्फत वाळूचे उत्खनन वाहतूक डेपो निर्मिती व विक्री करण्यात येत होती. डेपो मार्फत वाळू उपलब्ध करून देण्यात आलेल्या अडचणी, डेपो पद्धती व लिलाव पद्धती मध्ये दोष आढळून आले त्यानुसार नव्या धोरणानुसार, आता पर्यावरण विभागाच्या परव-ानगीनंतर नदीपात्रातील वाळू गटांसाठी जिल्ह्यातील प्रत्येक उपविभागीय अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व वाळू गटांचा एकत्रित एकच ई-लिलाव प्रसिद्ध करण्यात येईल. या लिलावाचा कालावधी दोन वर्षांचा राहणार, तसेच खाडीपात्रातील वाळू गटांसाठी महाराष्ट्र सागरी मंडळाने निश्चित केलेल्या प्रत्येक वाळू गटासाठी ई-लिलाव पद्धतीने कार्यवाही करण्यात येईल. या लिल-ावाचा कालावधी तीन वर्ष राहील. लिलावाद्वारे उत्खनन करण्यात येणाऱ्या प्रत्येक वाळू गटामधील १० टक्के वाळू विविध घरकूल लाभार्थ्यांसाठी पाच ब्रासपर्यंत मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# आरक्षण वर्गीकरण अंमलबजावनी मोर्चाला मातंग समाजाचा उत्स्फुर्त प्रतिसाद!

तभा वृत्तसेवा
परतुर/प्रतिनिधी

परतूर शहरात सर्वोच्य न्यायालयाच्या निर्देशानुसार अनुसूचित जाती प्रवर्गात आरक्षण वर्गीकरण लागू करणे आणि मातंग समाजावर होत असलेल्या अन्याय अत्याचारा विरोधात मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी मोठ्या संख्येने समाज बांधव सहभागी झाले होते.

प्रामुख्याने मोर्च्यात अनुसूचित जाती प्रवर्गात आरक्षण वर्गीकरण झालेच पाहिजे आणि आरोपीला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे या मागणीच्या पाट्या हातात घेत नागरिकांनी उत्सूर्फपने घोषणा दिल्या.क्रांतीगुरू लहुजी साळवे चौक ते उपजिल्हाधिकारी कार्यालय या मार्गे शिस्तबद्धतेने मोर्चाचे रूपांतर सभेत झाले. दरम्यान उपजिल्हाधिकारी यांना कुमारी माहेश्वरी आव्हाड,अश्विनी हिवाळे,

रूपाली हिवाळे,आरती साबळे या मुलींच्या वतीने निवेदन देण्यात आले. व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्ते गणपत भिसे, ड.विलास साबळे, ड राम चव्हाण,मारुती वाडेकर,राजू कसबे,संजूबाबा गायकवाड,भास्कर नाना शिंदे,शिवाजी भाऊ कांबळे,संतोष तुपसौंदर्य, रविकांत जगधने,शिवराज जाधव,रंगनाथ गजले, सुरेश साळवे,रवी पाखरे



किसन लांडगे,गुलाब साठे,नामदेव साळवे यांची उपस्थिती होती.

आयोजित मोर्च्यात दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजीच्या माननीय सर्वोच्य न्यायालय निर्णयाच्या अनुषंगाने १५ ऑक्टोंबर २०२४ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णया नुसार महाराष्ट्र शासनाने राज्यात तात्काळ आरक्षण वर्गीकरण विधेयक मंजूर करून येत्या जुन महिन्या पासून आरक्षण वर्गीकरणाची आमलबजावणी करून अनुसूचित जातीतील अतीवंचित जातींना संविधानिक समतेचा सामाजिक न्याय मिळवून द्यावा.याबाबतची मागणी व्यासपीठावरील मान्यवरानी केली.

तसेच दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी परभणी येथील अतीवंचित असणाऱ्या मातंग समजातील निष्पाप अल्पवयीन बालीकेवर निराधमानी केलेला अत्याचार प्रकार अत्यंत घृणास्पद आणि निंदनीय आहे.याबाबत आरोप-ीला फाशीची शिक्षा होण्यासाठी विशेष चौकशी पथक (डखढ) स्थापन करून सदर खटला जलदगती न्यायालयात चालवण्यात यावा आणि नराधम आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे आणि या प्रकरणातील अधिकच्या आरोपींवर कायदेशीर कडक कार्यवाही करावी. आणि महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जातीतील अतीवंचित असणाऱ्या मातंग समाजावर दैंनदिन सातत्याने घडत असलेले अन्याय अत्याचार मालिका ही अत्यंत दुर्दैवी बाब असून याबाबत महाराष्ट्र सरकारने प्रत्येक घटनेतील गुन्ह्यात विशेष चौकशी पथक स्थापन करून दोषी आरोपींवर कायदेशीर कडक शासन करावे आणि मातंग समाजाला तात्काळ न्याय मिळवून द्यावा. याबाबत मोर्च्यातची मागणी करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी-तेसाठी अशोक साबळे, इंद्रजीत हिवाळे, ज्ञानेश्वर साळवे, विठ्ठल भारसाकळे,दत्ता हिवाळे,विलास लोखंडे, सुंदर भारसाकळे,पांडुरंग नाटकर,प्रकाश लोंढे,लखन कांबळे,गणेश आव्हाड, यांनी परिश्रम घेतले.

# पि.आय.निकाळजे साहेब मंठ्यातील व्हाईट कॉलरमधील काळे गुंडे शोधा!

## सट्टा बुक्की चालकावर कारवाई होणार का? नागरीकांना पडला प्रश्न

तभा वृत्तसेवा
जालना । प्रतिनिधी

**आयपीएल क्रिकेट सट्टा**
**भाग -३**

मागील महिन्यापासून सुरु असलेल्या क्रिकेट सट्ट्यावर मंठा शहरांमध्ये कोट्यावधीची उलाढाल दररोज होत आहे.तरी देखील या प्रकरणी आजपर्यंत एक सुद्धा कार्यवाही झाली नसल्याने बुक्की चालक व एजन्सी संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

मंठा शहरात आयपीएल क्रिकेट च्या सामन्यात अंदाजीत स्कोर यावर कमी पैशात जास्त पैशांचे आमिष दाखवून मोबाईलच्या माध्यमातून सुरू आहे. परभणी जिल्ह्यातील सेलू शहरातील राजकीय वलय असलेला सट्टा-बुकी चालक याच्यामार्फत मंथ सट्टा



चालविण्यासाठी वेगवेगळ्या मोबाईल नंबरचा वापर करण्यात येतो. सदर मोबाईल नंबर हे दुसऱ्याच्या नावावर घेतलेले असतात. विशेष म्हणजे शहरात सर्वांना माहिती आहे की कोण सत्ता घेतो कोण चालवतो परंतु संबंधित प्रशासन गचपडीची भूमिका घेत असल्यामुळे अनेक तरुणांना लुटण्याचा धंदा या सट्टा चालकांनी लावला आहे. सट्टा चालकांचे मोबाईल नंबर त्यांच्याकडे असताना देखील त्यावर कारवाई होत नाही. सदर मोबाईल नंबर पोलिसांनी ट्रॅक करून सीडीआर काढल्यास नक्कीच याचा शोध लागेल परंतु यावर पोलीस प्रशासन का कार्यवाही करत नसेल असा प्रश्न सुज्ञ नागरिकांना पडला आहे. या आयपीएल क्रिकेट सत्यामुळे शहरातील अनेक तरुण बरबाद झाले आहेत तर काही तरुण निर-ाशावादी झाले असून शहर सोडून जाण्याच्या तयारीत आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# एमजीएम विद्यापीठात विशेष संगीत मैफलीचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. १० : एमजीएम विद्यापीठाच्या वतीने 'भारतीय संविधान महोत्सव' आणि क्रांतिसूर्य ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त फुलेंचे अखंड आणि महाकवी वामनदादा कर्डक यांच्या निवडक गीतांची एक विशेष संगीत मैफल आयोजित करण्यात आली आहे. 'भीम-फुले माणसाला भेटला' या शीर्षकाने सादर होणारी मैफल संगीतातून सामाजिक परिवर्तनाच्या विचारांची मांडणी करणारी ठरणार आहे. शुक्रवार, दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता रुक्मिणी सभागृह, एमजीएम परिसर येथे ही मैफल होणार आहे.

या संगीत मैफलीची निर्मिती, संकल्पना आणि संगीत संयोजन संगीतकार डॉ.संजय मोहड यांनी केले आहे. विद्यार्थी वृंद आणि सहकारी कलाकार यांचा सहभाग या मैफलीत असणार आहे. या कार्यक्रमास एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित असणार आहेत.

या संगीत मैफलीस सर्वांना खुला प्रवेश असणार असून मोठ्या संख्येने नागरिकांनी यास उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## ओबेन इलेक्ट्रिक द्वारे २ नवीन शोरूम आणि सर्व्हिस सेंटर

छत्रपती संभाजी नगर : भारतातील घरगुती आणि संशोधन आणि विकास-चालित इलेक्ट्रिक मोटरसायकल उत्पादक, ओबेन इलेक्ट्रिक ने पुण्यातील पीसीएमसी प्रदेश आणि छत्रपती संभाजी नगर येथे दोन नवीन शोरूम आणि ओबेन केअर सर्व्हिस सेंटर सुरू करून महाराष्ट्रात आपला विस्तार केला आहे. या जोडणीसह, ही कंपनी आता महाराष्ट्रात ५ शोरूम आणि सेवा सर्व्हिस सेंटर चालवते, ज्यामध्ये पुण्यातील वाकड, शिवाजी नगर आणि धनकवडी येथील विद्यमान स्थानांचा समावेश आहे. या विस्तारामुळे ओबेनच्या उच्च-कार्यक्षमता असलेल्या ई-बाईक्सची वाढती मागणी आणि या प्रदेशातील ग्राहक आणि डीलरशिप भागीदारांमध्ये विक्रीनंतरची मजबूत सेवा अधोरेखित होते.

## फिनिक्स मार्केटसिटी, घेऊन आले आहे प्रीहिस्टोरिक ॲडव्हेंचर - डायनासोर वर्ल्ड

छत्रपती संभाजी नगर : - या उन्हाळ्यात, फिनिक्स मार्केटसिटीचा मोस्ट अवेटेड इव्हेंट - हॉलिडे लँड आता डायनासोर वर्ल्डच्या माध्यमातून तुम्हाला घेऊन जाणार आहे एका थरारक प्राचीन दुनियेच्या प्रवासावर.. ११ एप्रिल ते ०४ मे २०२५ दरम्यान लिबर्टी स्केअर येथे हा इव्हेंट होणार आहे. हा अविस्मरणीय अनुभव मुलांसाठी आणि कुटुंबांसाठी मौजमस्ती, माहिती आणि ॲडव्हेंचरची मेजवानी घेऊन येणार आहे. डायनासोर वर्ल्ड मध्ये मेसोजोइक युगातील जादू पुन्हा जिवंत केली गेली आहे- ज्यामध्ये टी-रेक्स, ब्रॅकिओसॉरस आणि प्टेरोडॅक्टिल्ससारखे आयकॉनिक डायनासोरस त्यांच्या खऱ्याखुऱ्या आकारामध्ये बघायला मिळणार आहेत. लिबर्टी स्केअर एका प्राचीन जंगलात रूपांतरित झालं आहे जिथे खरेखुरे डरकाळीचे आवाज, सेन्सरवर चालणारे प्राणी आणि संपूर्ण थीमच तुमचा अनुभव अधिक जिवंत आणि थरारक बनवतो.

## व्हायब्रंट बिल्डकॉन २०२५ चे उद्घाटन करणार आहेत.

नवी दिल्ली : भारतातील सर्वात मोठ्या बांधकाम साहित्य प्रदर्शनाचे उद्घाटन - व्हायब्रंट बिल्डकॉन २०२५ - १३ एप्रिल २०२५ रोजी नवी दिल्लीतील यशोभूमी कन्व्हेन्शन सेंटर येथे माननीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री श्री पियुष गोयल यांच्या हस्ते होणार आहे. हा कार्यक्रम जागतिक बांधकाम आणि पायाभूत सुविधा उद्योगाचा एक ऐतिहासिक मेळावा असेल, जो २५० हून अधिक प्रदर्शक, ५०,००० हून अधिक देशांतर्गत अभ्यागत आणि ७०० हून अधिक आंतरराष्ट्रीय खरेदीदारांना आकर्षित करेल आणि २७,००० चौरस मीटरच्या भव्य प्रदर्शन क्षेत्रात प्रवेश करेल. या प्रदर्शनाचा पडदा उचलण्याचा कार्यक्रम नुकताच नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये प्रमुख भागधारक आणि उद्योग नेते उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये हे समाविष्ट होते:

## समृद्ध ग्राहकांसाठी एलिट प्लस सेव्हिंग्स अकाउंट सादर

मुंबई : संपूर्ण भारतातील युनिव्हर्सल बँक असलेल्या बंधन बँकेने सधन ग्राहकांना बँकिंगचा अधिक चांगला अनुभव देण्यासाठी खास डिझाईन आणि तयार केलेले एलिट प्लस सेव्हिंग्स अकाउंट सुरू करत असल्याची घोषणा आज केली. एलिट प्लस सेव्हिंग्स अकाउंटने आकर्षक वैशिष्ट्ये सादर केली असून त्यात एक प्रीमियम एलिट प्लस डेबिट कार्ड आणि खास लाइफस्टाईल लाभ असलेल्या सुविधांचा समावेश आहे. या उत्पादनाचे उद्घाटन बंधन बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पार्थ प्रतिम सेनगुप्ता यांच्या हस्ते झाले, यावेळी कार्यकारी संचालक व मुख्य व्यवसाय अधिकारी श्री. राजिंदर कुमार बब्बर आणि कार्यकारी संचालक व मुख्य कामकाज अधिकारी श्री. रतन कुमार केश उपस्थित होते. भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार सौरव गांगुली हे एलिट प्लस सेव्हिंग्स अकाउंटच्या पहिल्या काही ग्राहकांपैकी एक बनले आहेत.

## ट्यून सिरीज २ लॉंन्च

मुंबई - जेबीएलची नवीन ट्यून सिरीज २ ही आकर्षक डिझाइन्सच्या त्रिकूटासह वैयक्तिक ऑडिओची पुनर्परिभाषा करत आहे - अर्गोनॉमिक बड-शैलीतील डिझाइनसह ट्यून बड्स २, स्लीक क्लोज्ड-टाइप स्टिक डिझाइनसह ट्यून बीम २ आणि वर्धित ध्वनी गुणवत्तेसाठी मोठे १२ मिमी ड्रायव्हर्स असलेले ओपन-टाइप स्टिक डिझाइनसह बहुमुखी ट्यून फ्लेक्स २, जे अधिक ओपन लिसनिंग अनुभव पसंत करणाऱ्या वापरकर्त्यांसाठी योग्य आहे. एकूण ४८ तासांपर्यंतच्या प्लेबॅकच्या प्रभावी बॅटरी लाइफसह, ट्यून सिरीज २ दीर्घकाळ चालणाऱ्या कार्यक्रमांमध्ये आणि दैनंदिन वापरात अखंड संगीत ऐकण्याची सुविधा देते. टिकाऊपणासाठी बनवलेले, हे इअरबड्स खझ५४ पाणी आणि धूळ प्रतिरोधक आहेत, ज्यामुळे ते कोणत्याही साहसासाठी किंवा दैनंदिन दिनचर्येसाठी एक विश्वासार्ह साथीदार बनतात.

## मॅटरने सुरु केले वर्ल्ड-क्लास मॅन्युफॅक्चरिंग हब

छत्रपती संभाजी नगर -उत्पादन क्षमतेचा वेग वाढवत आणि सस्टेनेबल वाहतुकीच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा गाठत, मॅटरने चांगोदर, अहमदाबाद येथे आपल्या पहिल्या वर्ल्ड -क्लास मॅन्युफॅक्चरिंग हबचे उद्घाटन केले. गुजरातचे माननीय मुख्यमंत्री श्री. भूपेंद्रभाई पटेल यांच्या हस्ते या प्रकल्पाचे उद्घाटन झाले असून, भारतात इलेक्ट्रिक वाहतुकीच्या नव्या युगाची सुरूवात झाली आहे. उत्पादनातील उत्कृष्टता, प्रक्रियेतील वेग आणि नावीन्यतेला चालना देण्याच्या उद्देशाने डिझाइन करण्यात आलेले हे हब मॅटर एरा - जगातील पहिली मैन्युफैक्चर्ड गिअर्ड इलेक्ट्रिक बाईकसाठी महत्त्वपूर्ण असून, सस्टेनेबल वाहतुकीच्या भविष्यास नवी दिशा देणार आहे.

## बीबीए अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याची शेवटची संधी

मुंबई : सिम्बॉयसिस सेंटर फॉर मॅनेजमेंट स्टडीज, पुणे या सिम्बॉयसिस इंटरनॅशनल (अभिमत विद्यापीठ) अंतर्गत असलेल्या ख्यातनाम संस्थेतर्फे त्यांच्या लोकप्रिय बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (बीबीए) अभ्यासक्रमासाठीच्या नोंदणीची अंतिम तारीख जवळ येत असून त्यातील जागा वेगाने भरल्या जात असल्याची सूचना संभाव्य उमेदवारांना देण्यात येत आहे. सिम्बॉयसिस एंट्रन्स टेस्टसाठी विद्यार्थ्यांनी १२ एप्रिल २०२५ पर्यंत नोंदणी करायची आहे. नोंदणीसाठी अखेरची सूचना करताना एससीएमएस पुणेच्या संचालिका डॉ. आद्या शर्मा म्हणाल्या, दरवर्षी हजारो विद्यार्थी या दमदार आणि भविष्याची वाट दाखवणाऱ्या वातावरणाचा भाग होण्यास उत्सुक असतात, असा आमचा अनुभव आहे. आता नोंदणीसाठी काहीच दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे, कोणाचीही संधी हुकू नये, याची खातरजमा आम्हाला करायची आहे.

# शासनाच्या १०० दिवसाच्या कार्यक्रमाअंतर्गत : विभागीय आयुक्त दिलीप गावडे

### यांचा विविध कामगार संघटना, जिल्हा व्यापारी असोसिएशनशी संवाद

छत्रपती संभाजीनगर, दि.१०, (विमाका) : शासनाच्या १०० दिवसाच्या कार्यक्रमा अंतर्गत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी विविध कामगार संघटना, जिल्हा व्यापारी असोसिएशन यांच्याशी संवाद साधत त्यांच्या अडचणी समजून घेत अडचणी सोडविण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे सांगितले.

विभागीय आयुक्त कार्यालयात बैठकीवेळी सहायक कामगार आयुक्त श्री. युवराज पडीयाल तसेच माथाडी मंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

कामगार प्रतिनिधिनी विशेष करून औद्योगिक क्षेत्रामध्ये कामगारांवर होणाऱ्या अन्यायाचे मुद्दे मांडले. अनेक कारखान्यांमध्ये कंत्राटी कामगारांना किमान वेतन, बोनस इत्यादी नियमानुसार मिळत नाही तसेच वर्षानुवर्षे काम करून कामगाराना कंपनीमध्ये कायम केले जात नाही. तसेच संघटना स्थापन केल्यास मालक वर्गाकडून त्रास दिला जातो. कामगारांना नियमबाह्य कमी केले जाते.

माथाडी कामगारांचे देखील विविध प्रश्न आहेत त्यांची सोडवणूक झाली पाहिजे तसेच निरीक्षणाचे अधिकार पुन्हा कामगार अधिकारी यांना प्राप्त झाले पाहिजेत तसेच कामगार कार्यालयात सोई सुविधा नसल्याने त्या कार्यालयास इतर ठिकाणी जागा मिळावी असे मुद्दे उपस्थित केले. सहायक कामगार आयुक्त यांनी विविध कामगार कायद्यातील कामगार विषयक तरतुदी निदर्शनास आणून दिल्या.

व्यापारी असोसिएशनच्या प्रतिनिधींनी सांगितले की, छत्रपती संभाजीनगर भारतामध्ये उद्योगासाठी प्रसिद्ध होत आहे त्यामुळे येथील औद्योगिक वातावरण हे कामासाठी पोषक आहे अशी प्रतिमा निर्माण करणे ही इथल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे. तसेच व्यापाऱ्यांना ट्रक उभा करण्यासाठी ट्रक टर्मिनलसाठी जागा मिळाली पाहिजे तसेच दिवसा कमी रहदारीच्या वेळेत मालवाहतूक ट्रकांना मोंढा मध्ये प्रवेश मिळावा अशी मागणी केली. यावर बैठकीमध्ये सर्व मुद्दाबाबत सविस्तर चर्चा झाली.

विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी बैठकीच्या प्रत्येकाचे म्हणणे एकल्यानंतर याबाबत संबंधित विभागांशी व त्यांचे विभाग प्रमुखांशी चर्चा करून समन्वयाने प्रश्न सोडविणे बाबत पत्रव्यवहार करण्यात येईल व या विभागाची औद्योगिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राहील व उद्योगासाठी अत्यंत चांगले वातावरण या शहरांमध्ये निर्माण होईल यासाठी प्रशासन नेहमी तत्पर राहील असे सांगितले.

यावेळी संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# सिल्लोड शहरात भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव उत्साहात साजरा

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि १०, सिल्लोड येथे भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. सिल्लोड शहर व तालुक्यात आज दिवसभर भगवान महावीर जयंतीचा उत्साह पहायला मिळाला. भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवा निमित्त शहरातील भगवान महावीर जैन मंदिर येथून सवाद्य भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभा यात्रेत आ. अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी आ. अब्दुल सत्तार यांनी उपस्थितांशी संवाद साधत भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

शोभा यात्रेत सकल जैन समाजाच्या वतीने बँड बाजा, अश्वरथ, पालखी सह भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. जय जीनेंद्र, जय भगवान महावीर स्वामी, जय आनंद च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. याप्रसंगी भगवान महावीर चौक येथे स्तंभ पुजन व प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शहरातील जैन मंदिर ते मेन मार्केट , पुढे भगवान महावीर स्तंभ व प्रवेशद्वार पासून सरळ मुख्य मार्गाने निघालेल्या शोभा यात्रेचा समारोप टिळक नगर भागातील जैन स्थानक येथे करण्यात आला. भगवान महावीर जयंती निमित्त जैन स्थानक येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जवळपास ५१ जणांनी या रक्तदान शिबिरात स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले.

अहिंसा परमो धर्म: जगा आणि जगू द्या भगवान महावीर यांचे विचार आजही समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन आ. अब्दुल सत्तार यांनी शहरातील जैन स्थानक येथे शोभा यात्रा समारोप प्रसंगी व्यक्त केले.

शहरात भगवान महावीर जयंती निमित्त दरवर्षी भव्य शोभायात्रा काढण्यात येते. सर्व समाजातील लोक या शोभा यात्रेत सहभागी होतात यातून सामाजिक एकतेचा संदेश पहायला मिळतो असे देखील आ. अब्दुल सत्तार म्हणाले. सिल्लोड नगर परिषदेच्या माध्यमातून मराठवाड्यात पहिल्यांदा भगवान महावीर प्रवेशद्वार व त्यासमोर भव्य स्तंभ उभारण्यात आले आहे. जैन बांधवांच्या मागणीनुसार येथे उभारण्यात आलेल्या भगवान कुंथुनाथ मंदिर परिसरात अहिंसा झोन घोषित करण्यात आले असल्याची माहिती आ. अब्दुल सत्तार यांनी मार्गदर्शन करतांना दिली.

शोभा यात्रा व त्यानंतर जैन स्थानक येथे झालेल्या कार्यक्रमास उत्सव समितीचे सल्लागार सुभाषसेट जैन, धरमचंद मंडलेचा, विनोद मंडलेचा, नंदकिशोर सहारे, रमेश कासलीवाल, पद्माकर गोसावी, अनिल बोरा, किशोर अग्रवाल, दुर्गेश जैस्वाल, सुदर्शन अग्रवाल, मनोज झंवर, मारोती पा. वराडे, विठ्ठल सपकाळ, शंकरराव खांडवे, सुशील ओस्त्वल, सुनील पगारिया, राजू गौर, अनिल लोहाडे, भिकचंद कर्णावट, भाऊसाहेब गोसावी, डॉ. बाफना, सयाजीराव वाघ, दीपक अग्रवाल यांच्यासह भगवान महावीर जयंती उत्सव समितीचे मयूर छाजेड, मयूर लोहाडे, आशिष कर्णावट, कमलेश बोरंदिया, महावीर गोसावी, यश मंडलेचा, सम्यक पाटणी आदिंसह उत्सव समितीचे पदाधिकारी, सदस्य व तालुक्यातील सकल जैन समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# १९ वर्षांखालील राष्ट्रीय शालेय फुटबॉल स्पर्धेसाठी मौलाना आझादचा विद्यार्थी मोहम्मद जैद याची निवड

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१० एप्रिल : मौलाना आझाद रौजाबाग छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील मोहम्मद जैद मोहम्मद आरिफची १५ एप्रिल ते २१ एप्रिल दरम्यान मणिपूर,इम्फाळ येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील शालेय फुटबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.या प्रतिष्ठित स्पर्धेत देशभरातील अव्वल संघ सहभागी होतील.मोहम्मद जैदची निवड त्याच्या मैदानावरील अपवादात्मक कौशल्याचा पुरावा आहे.

मोहम्मद जैद १० एप्रिल ते १४ एप्रिल दरम्यान नागपूर येथील कोराडी रोड येथील विभागीय क्रीडा संकुलात महाराष्ट्र संघाच्या प्रशिक्षण शिबिरात सहभागी होईल.




प्राचार्य डॉ.मजहर अहमद फारुकी,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य शेख अब्बास,क्रीडा शिक्षक अकबर खान,शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी आणि जैदच्या मित्रांनी या मोठ्या कामगिरीबद्दल त्याचे अभिनंदन केले.जैदची निवड ही मौलाना आझाद महाविद्यालयामध्ये नियमितपणे होणाऱ्या क्रीडा उपक्रमांचे प्रतिबिंब आहे.

राष्ट्रीय फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धा तरुण खेळाडूंना त्यांचे कौशल्य दाखवण्यासाठी आणि देशातील सर्वोत्तम खेळाडूंविरुद्ध स्पर्धा करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करते.मोहम्मद जैद मोहम्मद आरिफला आम्ही स्पर्धेसाठी शुभेच्छा देतो आणि तो राष्ट्रीय स्तरावर कायमचा ठसा उमटवेल अशी आशा करतो.

# पैठण येथ सम्राट शालिवाहन राजा यांची जयंती साजरी

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०८ :- दक्षिण काशी पैठण नगरीत दक्षिणा पती सम्राट शालिवाहन राजा यांची जयंती मोठ्या उत्साही वातावरणात तीर्थस्थभ व विजय स्तंभ उद्यानाला महाराष्ट्र कुंभार समाज महासंघ यांच्यावतीने साजरी करण्यात आली. यावेळी महाराष्ट्रातून आलेल्या कार्यकर्त्यांनी सम्राट शालिवाहन राजा यांचा जय जय कार करुन परीसर दुम दुमुन टाकला. शालिवाहन पालथ्या नगरीचा तात्काळ केंद्र सरकारकार ने विकास करावा अशी मागणी यावेळी करण्यात आली.समाज बांधव सर्वश्री आशोक सोनवने .श्रीराम तेलंग,राजकुमार



गोरगरीळे,बंडेराव जोशी,विनायक राऊत,सूर्यभान घोडके,निवृत्ती जाधव,महादेव खटावकर,मोहन जगदाळे,रमाकांत क्षीरसागर,रवि चौधरी,गणेश रोकडे,दिनेश पारीख,गणेश पंजावाले,साहेबराव रोकडे,सतीश दळे,राम पंजावाले आदींचे भाषणे झाली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गणेश डेंगळे,प्रमोद पंजावाले,सुनील रोकडे,कृष्णा पंजावाले,अमोल रोकडे,रवी पंजावाले,विठ्ठल रोकडे,राजू भालेकर, विपीन तिडके विनोद पंजावाले,लाला रिळे, आदिनाथ गोरे,पंढरीनाथ खळदकर, महेश आगे, अंबादास रोकडे,अमोल रोकडे, विशाल पंजावाले आदींनी परिश्रम घेतले.

पैठण येथील बसस्थानकाला सम्राट शालिवाहनांचे नाव देण्यात यावे यासाठी महाराष्ट्र शासनाने पुढाकार घ्यावा.

महाराष्ट्र शासनाच्या संस्कृतीक विभागाने सम्राट शालिवाहनांच्या कार्याची दखल घेतलेली आहे, त्यामुळे सम्राट शालिवाहनांचा पुतळा पैठण येथे उभा करण्यासाठी ची तात्काळ कारवाही करावी. अश्या मागण्या करण्यात आल्या. शेवटी नपासायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# वाचनाने व्यक्तिमत्व विकास होतो - डॉ.रावसाहेब बारोटे

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१० एप्रिल


संत ज्ञानेश्वर महाविद्यालय कै.बाबुराव काळे मराठी स्कूल आणि जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव यांच्या वाचनकट्टा या संयुक्त उपक्रमाच्या समारोपप्रसंगी,उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे हे बोलत होते. गेल्या दोन वर्षापासून वाचन कट्टा हा उपक्रम या तिन्ही संस्था मिळून राबवत होत्या.विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी निर्माण व्हावी आणि वाचन संस्कृती निर्माण व्हावी म्हणून हा उपक्रम राबवला जात होता.आज या उपक्रमाच्या समारोपप्रसंगी पुढे बोलताना डॉ.बारोटे म्हणाले आपल्याला भाषा ही सोपी वाटते.पण ती सोपी




नसते.सूक्ष्मपणे आणि नेमकेपणाने उपयोग करताना भाषेचा अभ्यासच असावा लागतो. वाचनकट्टासारख्या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व कळतं.भाषेची जाण येते आणि वाचनाने व्यक्तिमत्व विकास होतो. त्यामुळे अशा उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल मी सर्व विद्यार्थ्यांचे आणि उपक्रम राबवल्याबद्दल सर्व शिक्षकांचे अभिनंदन करतो.

वाचनकट्टा उपक्रमातून घेतलेल्या ज्ञानाचा विद्यार्थ्यांनी पुढील जीवनासाठी उपयोग करून घ्यावा.असेही त्यांनी यावेळी सांगितले.कार्यक्रमात सुरुवातीला वाचन कट्टाच्या समन्वयक प्रा.ज्योती स्वामी यांनी प्रास्ताविक केलं आणि अहवाल वाचन केलं. हा उपक्रम राबवताना गेल्या दोन वर्षांमध्ये तिन्ही संस्थांनी मिळून १६ कार्यक्रम घेतले. कविता,ललित गद्य,कोश,चरित्र वांग्मय यांचा परिचय करून दिला गेला.ग्रंथ प्रदर्शन,कोश प्रदर्शन दिवाळी अंक प्रदर्शन आणि अभिवाचन इत्यादी विविध उपक्रम राबवल्याचे, तसेच या कार्यक्रमांमधून ५० विद्यार्थी आणि चार प्राध्यापकांनी अभिवाचन केल्याचे त्यांनी आपल्या अहवालातून सांगितले.यावेळी धनश्री कानोरे या विद्यार्थिनीने विंदा करंदीकर यांची देणाऱ्याने देत जावे आणि समृद्धी देशमुख हिने मंगेश पाडगावकर यांची सांगा कसं जगायचं या कवितांचे अभिवाचन केले.दीप्ती चौधरी, साक्षी गव्हाड,सायली कराळे,मनीषा देसाई आणि निर्मला बोराडे यांनी मनोगते व्यक्त केली.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (८६) आदर्श

श्री गुरुजींच्या वडिलांचे नाव सदाशिवराव व आईचे नाव लक्ष्मीबाई आहे. हे दोघेही

ताई-भाऊजी नावाने परिचित होते. या ताई भाऊजींच्या नऊ लेकरांमध्ये फक्त हा माधव जिवंत राहिला होता. हा माधव बालपणापासून तल्लख बुद्धिमत्तेचा होता आणि इतरांची दुःखे व अडचणी दूर करण्यासाठी मित्रत्वाचे नाते जोडणारा होता. हा माधव शिकत कुठे होता! मध्य प्रदेशातील महाकोशल विभागातील अंतर्भागातील सरायपल्ली या खेड्यातील शाळेत. कारण येथील शाळेत भाऊजी हे ज्ञानदानाची आस्था असलेले सच्चरित्र शिक्षक होते व ताई धर्मपरायण स्त्री होती. करारीपणा, निस्तृहपणा, कर्तव्यनिष्ठा, धर्मनिष्ठा, परिश्रमशीलता आणि ज्ञानोपासनेची आवड हे गुण श्री गुरुजींच्या जीवनात माता-पित्यांच्या जिवंत आदर्शा मुळे प्रकटले आहेत व या थोर आदर्शाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख श्री गुरुजींनी अनेक वेळा केला आहे.

क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती




# खुलताबाद येथे हनुमान जयंती निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व संगीतमय राम चरित्र कथा आयोजन

### भाविक भक्तांनी लाभ घ्या संस्थांच्या वतीने आवाहन



खुलताबाद प्रतिनिधी : खुलताबाद, येथे भद्रा मारुती संस्था चे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय काशिनाथ दादा बारगळ व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी सरला बेट येथील गुरुवर्य महांत. सद्गुरु नारायणगिरीजी महाराज यांच्या, कृपाशीर्वादाने .गेल्या ३५ वखुलताबादर्षा पासून, चालू असलेला , अखंड हरिनाम सप्ताह साठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या लाखो भक्त च्या नवसाला पावणाऱ्या भद्रा मारुती चरणी लीन होतात , यावर्षी संस्थांच्या वतीने महाराष्ट्रातील नामवंत संगीतमय रामचरित्र कथा , रामरावजी ढोक महाराज यांच्या मधुर वाणीतून सायंकाळी ७ ते १० कथेचे आयोजन मोठ्या उत्साहात भव्य दिव्य स्वरूपा आयोजन करण्यात आले आहे हनुमान जयंतीच्या सोहळ्यासाठी येणाऱ्या भक्तांना सुख सुविधा पुरवण्यासाठी संस्थांच्या वतीने नियोजन करण्यात आले आहे छत्रपती संभाजी नगर ते खुलताबाद या महामार्ग वरून येणाऱ्या भाविकांसाठी नगर नाका ते खुलताबाद या ठिकाणी दानशूर भद्रा मारुती भाविकांच्या वतीने पायी चालत येणाऱ्या भाविकांसाठी चहापाणी फराळ यासाठी ठिकठिकाणी स्टॉल लावण्यात येतात (दौलताबाद घाटातील दक्षिण मुखी हनुमान राया या ठिकाणीही भाविकांसाठी जेवणाची व्यवस्था भारता कुटुंबाच्या वतीने करण्यात येते). (दि १२ . हनुमान जयंतीच्या दिवशी सकाळी , ४ चारच्या सुमारास महाराष्ट्र राज्याचे मंत्री अतुल मोरेश्वर सावे, यांच्या हस्ते मुख्य पूजा अभिषेक करण्यात येणार आहे ) (. काल्याची किर्तन सेवा सरला बेट येथील रामगिरीजी महाराज यांच्या काल्याचे किर्तन नंतर महाप्रसादाने सांगता होणार आहे )भद्रा मारुती संस्थानाध्यक्ष व सर्व ट्रस्टी मंडळ व कर्मचारीवर्ग यांच्यावतीने येणाऱ्या भाविकांसाठी चोख व्यवस्था करण्यात आल्याची माहिती संस्थांच्या वतीने देण्यात आली आहे

# नांदूर-मधमेश्वर कालव्यास पाणी सोडा, अन्यथा उद्या कडावर धडक मोर्चा

### आधार शेतकरी जलदूत समितीचा इशारा

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी- नांदूर-मधमेश्वर जलद कालव्यास उन्हाळी हंगामातील सिंचनासाठी पहिले आवर्तन गुरुवार, १० एप्रिल २०२५ पर्यंत सोडण्यात यावे, अन्यथा शुक्रवार ११ एप्रिल रोजी कडा कार्यालयावर लाभधारक शेतकऱ्यांच्या वतीने धडक मोर्चा काढण्यात येईल, असा स्पष्ट इशारा आधार शेतकरी जलदूत समितीच्या वतीने देण्यात आला आहे. याप्रकरणी लाक्षक्षेत्र विकास व प्राधिकरण 'कडा' चे मुख्य अभियंता व मुख्य प्रशासकांना देण्यात आले आहे.

नांदूर-मधमेश्वर कालव्याच्या वैजापूर, गंगापूर व कोपरगाव लाभक्षेत्रातील लाभधारक शेतकऱ्यांनी उन्हाळी कांदा, मका, बाजरी, भाजीपाला तसेच जनावरांसाठी हिरवा चारा व फळबाग या पिकाची मोठ्या प्रमाणात लागवड केलेली आहे. मोठ्या प्रमाणात सूर्याचे तापमान वाढत असल्यामुळे जमिनीतील पाणी पातळी खोल गेली आहे. त्यामुळे लागवड केलेली पिके पाण्याअभावी जळून जात आहेत. तसेच पिकाच्या होणाऱ्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांना आर्थिक संकटांना संकटाला सामोरे जावे लागत आहे. त्वरित पाणी नाही सोडल्यास लाभक्षेत्र शेतातील उभी पिके जळून शेतकऱ्याचे करोडो रुपयाचे नुकसान होणार आहे. मोर्चात लाभ क्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आधार शेतकरी जलदूत समितीचे अध्यक्ष पंडित शिंदे, कृष्णा पाटील, सोन्याबापू शिरसाट, मंदाबाई न्हावले, अनिता चोभे, तन्मय कांबळे, लताबाई कांगुने, मनीषा बारे, बिजलाबाई गुडदे, संजय गुडदे, सचिन गायकवाड, कृष्णा कुंजीर यांनी केले आहे.

## दलितांना गायरानांवरून बेदखलकरणे तातडीने थांबवा : माकप

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : सौर ऊर्जा पॅनल बसवण्यासाठी राज्यात अनेक ठिकाणी खासगी कंपन्यांना गावानजीकची गायराने अत्यल्प मोबदल्यात बहाल केली जात आहेत. अनेक ठिकाणी ही गायराने दलित समाजाच्या ताब्यात आहेत. अत्यंत गरीब अवस्थेत जीवन जगणाऱ्या दलित समाजाच्या कुड, पाचट, पत्राच्या गायरानातील घरांवर बुलडोझर फिरवले जात आहेत. पोलीस बळाचा वापर करून ताबा असलेल्या दलित कुटुंबांना गायरानांवरून हुसकावले जात आहे. बीड जिल्ह्यातील घाटनांदूर, उजणी, बर्दापूर, बाभळगाव, जवळगाव, उंदरी, उमराई, केंद्रेवाडी, कोळपिंपरी गावांमध्ये अशा प्रकारची कारवाई खासगी सौर ऊर्जा कंपन्यांच्या भल्यासाठी पोलिसांच्या मदतीने व सरकारच्या पाठिंब्याने करण्यात आली आहे.

## अग्रलेख...

# जनमनाचे स्वप्न साकारणारी मुद्रा

जनतेच्या कल्याणासाठी देशोदेशीची सरकारे विविध योजना आखतात आणि त्या योजनांची अंमलबजावणी करून लोकप्रियता मिळवतात. लोकशाहीत संवैधानिक पद्धतीने निवडून आलेल्या प्रत्येक सरकारला अशा जनकल्याणार्थ योजना आखाव्याच आणि त्यातून लोकप्रियता मिळवण्याचा अधिकार मिळालेला असतो. मात्र प्रत्यक्षात स्थिती काय असते, अनेक योजना केवळ कागदावरच उतरलेल्या दिसतात. अंमलबजावणीच्या दृष्टीने त्यांनी कुठलीच प्रगती साधलेली दिसत नाही. केवळ सरकारी आदेश निर्गमित झाले म्हणजे सरकारने आखलेल्या योजना यशस्वी ठरल्या असे होत नाही. योजना आखताना त्या कुणासाठी आखायच्या, ज्यांच्यासाठी आखायच्या त्यांना या योजनांची खरोखरीच गरज आहे का, या योजनांमुळे मिळणारे लाभ इतर योजनांच्या तुलनेत कितपत लाभकारी आहेत, याचा अभ्यास करून तयार झालेल्या योजना यशस्वितेच्या दिशेने पुढे सरकतात. ही झाली पहिली पायरी. योजना तयार झाल्यानंतर तिला मंजुरी मिळविण्यासाठी अधिकाऱ्यांपासून ते मंत्र्यांपर्यंत साऱ्या लोकांच्या गळी उतरवण्याचे कसब पार पाडावे लागते. योजना मंजुरीनंतर अधिसूचना निघणे आणि योग्य प्रसिद्धीनंतर त्या योजनांच्या लाभासाठी लोकांनी अर्ज करणे याची सुरुवात होते. अर्जांच्या छाननीनंतर लाभार्थींची अंतिम यादी निश्चित होऊन त्या-त्या व्यक्तींच्या खात्यात योजनेचा पैसा पोहोचण्यापर्यंतच्या प्रक्रियेत अनेक लोक, लोकप्रतिनिधी, अधिकारी, तज्ज्ञ आणि श्रेय लाटणारी मंडळी त्यात सहभाग नोंदवतात. या प्रवासात अनेक योजना कुणाच्या तरी हलगर्जीपणामुळे म्हणा अथवा कुणीतरी मेख मारून ठेवल्याने अतिशय चांगल्या असूनही जनतेपर्यंत पोहोचत नाहीत आणि त्यांचा गर्भातच मृत्यू होतो. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लघु व्यावसायिकांना सक्षम करण्यासाठी आखलेल्या पीए मुद्रा लोनबाबत असे कुठलेही अडथळे आले नाहीत. ही योजना विनासायास या प्रक्रियेतून बाहेर पडली आणि गेल्या दहा वर्षांत तिने यशस्वितेचा उच्चांक गाठला. आजवर या योजनेमुळे ५२ कोटी ३३ लाख लोकांच्या जीवनात बदल घडून आले, त्यांची स्वप्ने साकार झालीत. ज्यांना पूर्वी दुर्लक्षित केले गेले, ते आर्थिक मदतीमुळे सक्षम झाले. लघु उद्योजक, छोटे दुकानदार यांना पूर्वी कर्जासाठी बँकांचे आणि वित्तीय संस्थांचे उंबरठे झिजवावे लागत. परंतु मोदी सरकारने मुद्रा योजनेतून जी समृद्धी आम जनतेच्या आयुष्यात आणली तिला तोड नाही. अशा या योजनेचा सध्या भारतभर गौरव सुरू आहे, तिचे गोडवे गायिले जाऊ लागले आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने तर त्यांच्या २०२४ च्या अहवालातच भारताच्या प्रधानमंत्री मुद्रा योजनेला तळागाळातील आर्थिक समावेशन आणि कर्जाद्वारे उद्योजकतेचा एक प्रमुख आधारस्तंभ म्हणून मान्यता दिली होती. ८ एप्रिल २०१५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या या दूरदर्शी योजनेने तरुण लोकांना केवळ कर्जच उपलब्ध करून दिले नाही तर स्वावलंबनाची संस्कृती देखील जोपासली आहे.

दहा वर्षानंतर पंतप्रधान मुद्रा योजनेतून अर्थक्षेत्रात एक मोठी क्रांती झाली आहे. या योजनांतर्गत ३३ लाख कोटी रुपयांहून अधिक तारणमुक्त कर्ज वितरित केली गेली. यातून लाभार्थी कुटुंबांचा उपजीविकेचा प्रश्न तर सुटलाच शिवाय, त्यांच्या आशा-आकांक्षा देखील उंचावल्या. मुद्रा अर्थात मायक्रो युनिट्स डेव्हलपमेंट अँण्ड रिफायनान्स एजन्सी लिमिटेडची स्थापना भारताच्या आर्थिक इतिहासात एक महत्त्वाचा टप्पा ठरली आहे. बँका, बँकेतर वित्तीय संस्था, लघु वित्तीय साह्य संस्था आणि शेवटच्या टप्प्यातील वित्तीय संस्थांद्वारे बिगर-कॉर्पोरेट, बिगर-शेती, लघु तसेच सूक्ष्म उद्योगांना आर्थिक मदत देण्यासाठी ही संस्था स्थापन करण्यात आली. यातून गरीब, महिला, छोटे व्यापारी, कारागीर यांना मोठ्या प्रमाणात लाभ मिळाला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दशकपूर्तीनिमित्त मुद्रा कर्ज योजनेच्या लाभार्थींसोबत चर्चा केली. त्यातून निघालेली माहिती डोळे विस्फारून टाकणारी आहे. योजना कशा आखाव्या म्हणजे त्या यशस्वी होतील, हे यातून शिकण्यासारखे आहे. अयशस्वी योजनांमागे कोणती सरकारे, मंत्री आणि अधिकारी असतात, हेदेखील यातून अधोरेखित झाले. या योजनेच्या मदतीने हजारो लोकांना त्यांचा व्यवसाय सुरू करता आला, याची याचि डोळा प्रचीती आली. या योजनेच्या मदतीने अनेकांना व्यवसायाचे स्वप्न पूर्ण करता आले. लाभार्थींशी झालेल्या संवादानंतर पंतप्रधानांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर त्यांचे मनोगत व्यक्त केले आहे. त्यांनी देशभरातून त्यांच्या निवासस्थानी आमंत्रित केलेल्या लाभार्थींची मनोगते जाणून घेतली आणि त्यांच्या आयुष्यात झालेल्या बदलांचीही नोंद घेतली. अनुभव कथनातून अनेक सक्सेस स्टोरीज बाहेर आल्या. अनेक लोकांनी या योजनेच्या मदतीने त्यांच्या आयुष्यात काय आणि कसा बदल झाला, त्याची माहिती दिली. इतकेच नाही तर या योजनेच्या आर्थिक मदतीने त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता आले असे सांगितले. यापूर्वी अनेक लाभार्थी केवळ २० हजार रुपयांची कमाई करीत होते. पण या योजनेमुळे त्यांच्या उत्पन्नात दुपटीने वाढ झाली. पंतप्रधानांनी यावेळी अनेक तरुणांशीही संवाद साधला. त्यांनी सांगितले की, जेव्हा त्यांनी नोकरी सोडली तेव्हा त्यांचा पगार ७० हजार रुपयांच्या घरात होते. त्यांना स्वतःचे विश्व उभे करायचे असल्याने त्यांनी मुद्रा योजनेची मदत घेतली. या योजनेच्या मदतीने ते आज २ लाख रुपये महिना कमावत आहेत. शिवाय त्यांनी अनेक लोकांच्या हाताला काम दिले आहे. या योजनेतील एक लाभार्थी कमलेश यांची यशोगाथा सांगितली. त्यानुसार, ते टेलरिंगचे, कपडे शिवण्याचे काम करतात. त्यांनी आता तीन महिलांना रोजगार दिला असून, त्यांच्या मुलांना चांगल्या शाळेत शिक्षणासाठी प्रवेश दिला आहे.

मुद्रा योजनेतील लाभार्थींची आकडेवारीही अतिशय बोलकी आणि सरकारच्या सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टिकोनावर प्रकाश टाकणारी आहे. देशभरातील महिलांच्या नेतृत्वाखालील उद्योगांना चालना देण्यात या योजनेची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. कारण मुद्रा लाभार्थींपैकी ६८ टक्के महिला आहेत. मुद्रा खात्यापैकी जवळजवळ ५० टक्के खाती अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीय वर्गातील उद्योजकांकडे आहेत, ज्यातून या योजनेचा लाभ कोणापर्यंत पोहोचला याची स्पष्टता येते. अल्प उत्पन्न गटातील लोक या योजनेमुळे लाभान्वित झाल्याची ही कहाणी दलित, पीडित, मागासवर्गीयांसाठी सरकारने काय केले, याची जंत्रीच उभी करते आणि विरोधकांचे तोंड बंद करते. ओबीसींच्या नावाने राजकारण करणाऱ्यांनी एकवार ही आकडेवारी डोळ्याखालून घातल्यास त्यांना मागास समाजाच्या उत्थानासाठी सरकार कोणती पावले उचलत आहे, हे कळल्याशिवाय राहणार नाही. एकूण मुद्रा कर्ज प्राप्तकर्त्यांपैकी सुमारे ११ टक्के अल्पसंख्यक समुदायापैकी आहेत, ज्यातून विविध सामाजिक-आर्थिक गटांना आधार देण्यासाठीचा योजनेचा समावेशक हेतू स्पष्ट होतो. अर्थमंत्रालयाचे सचिव एम. नागराजू यांच्या मते या योजनेंतर्गत कर्जाची परतफेड करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. बँकांची एकूण अनुत्पादक मालमत्ता २.२१ टक्क्यांपर्यंत घसरली आहे. श्रेणीबद्ध कर्ज रचनेमुळे (शिशु, किशोर आणि तरुण आणि तरुण प्लस) मुद्रा योजनेने हे सिद्ध केले आहे की, सूक्ष्म-उद्योजकांना विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, महिला आणि अल्पसंख्यक यासारख्या उपेक्षित समुदायातील लोकांना सरकार केवळ विकासाच्या प्रवासात सामील करून घेत नाही तर त्यांना प्राधान्यसुद्धा दिले जाते. एक विणकर विणकाम तर करतच राहतो, परंतु आता त्याला आधुनिक साधने आणि चांगल्या बाजारपेठाही उपलब्ध असतात. रस्त्यावरील विक्रेता त्याचा ठेला कायमस्वरूपी दुकानात अपग्रेड करतो. जनमनाचे स्वप्न साकारणारी मुद्रा योजनेची ही यशोगाथा छोट्या व्यावसायिकांसाठी जशी संजीवनी ठरली आहे तशीच ती सरकारी यंत्रणा योग्यरीत्या राबविली तर त्याचे परिणाम किती उत्तम मिळू शकतात, याचे उदाहरण देणारीही ठरली आहे. ▮

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# आणखी एक लक्षवेधी तंत्रशैली

संगणक क्षेत्रात अनेक लाटा येत असतात. सध्याची लाट आहे 'घिबली'ची. आपले छायाचित्र घिबली शैली वापरून ॲनिमेटेड पद्धतीने रूपांतरित करण्याचा धुमाकूळ सर्वत्र सुरू आहे. घिबली-शैलीतील प्रतिमानिर्मितीच्या नव्याने झालेल्या परिचयाने जगभरातील वापरकर्त्यांना मोहित केले आहे. त्यांना सामान्य फोटोंचे रूपांतर प्रतिष्ठित जपानी ॲनिमेशन स्टुडिओपासून प्रेरित होऊन मोहक दृश्यांमध्ये करता आले आहे. इन्स्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्स ॲपवर स्टुडिओ घिबलीने वर्चस्व निर्माण केले आहे. पंतप्रधान मोदी, सचिन तेंडुलकर, राजपाल यादवसह अनेक सेलिब्रिटींच्या फोटोंनी इन्स्टाग्रामवर धुमाकूळ घातला आहे. तसेच इतर लोकही आपल्या जुन्या आठवणींना घिबली टच देत समाज माध्यमावर फोटो शेअर करीत आहेत. या नवीन ट्रेंडने एआयच्या मदतीने जगभरातील लोकांना आपल्या जादुई शैलीत गुंगवले आहे. चॅटजीपीटीवर यूजर त्यांचा आवडता फोटो अपलोड करून 'कनव्हर्ट दिस इमेज इन टू घिबली' अशी कमांड देतात आणि काही क्षणांमध्येच घिबली शैलीतील छायाचित्रे मिळवता येतात. 'एआय'द्वारे त्याचे रूपांतर जपानी ॲनिमेशनच्या क्लासिक घटकांमध्ये केले जाते. त्यामुळे आठवणी या कलाकृतीचे रूप घेतात. हा ट्रेंड केवळ ओपन-एआयपुरता मर्यादित नाही, तर ग्रोक आणि जेमिनी या एआय प्लॅटफॉर्मनीही ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

जपानमधील 'स्टुडिओ घिबली' हा केवळ एक स्टुडिओच नाही, तर एक संकल्पना आहे. 'स्टुडिओ घिबली'च्या चित्रपटांमध्ये प्रामुख्याने जपानी संस्कृती, समृद्ध निसर्ग, मानवी भावना आणि कल्पनारम्य कथांचे अनोखे मिश्रण पाहायला मिळते. हा बदल करण्यासाठी नेमकं काय करावं लागतं? 'एआय' तंत्रज्ञानाच्या मदतीने हे आता अगदी सोपं झालं आहे. 'ड्रीम बाय वोमबो', 'डीप आर्ट', 'टूनमी' यासारख्या ॲप्सचा वापर करून काही सेकंदांमध्ये तुमचा फोटो 'घिबली' ॲनिमेशनसारखा दिसू शकतो. यासाठी वापरकर्त्यांना आपला फोटो अपलोड करून 'स्टुडिओ घिबली' किंवा 'ॲनिमे स्टाईल' फिल्टर निवडावा लागतो. अधिक ओरिजिनल लूक हवा असल्यास, 'ॲडोब फॉटोशॉप', 'प्रो क्रियेट' किंवा 'क्रीटा' यासारख्या सॉफ्टवेअरमध्ये डिजिटल पेंटिंग करून फोटोला हळुवार 'घिबली' टच देता येतो. काही जण यासाठी 'ब्लेंडर' किंवा 'आफ्टर इफेक्ट'सारख्या ॲनिमेशन सॉफ्टवेअरचादेखील वापर करून हलत्या प्रतिमा तयार करतात.



ॲनिमेशन ही केवळ मनोरंजनाची कला नाही, तर ते एक सशक्त अभिव्यक्तीचे साधन आहे. जगभरातील अनेक देशांनी आपल्या संस्कृतीनुसार ॲनिमेशनचे तंत्र विकसित केले. अमेरिकेत 'वॉल्ट डिझ्नी', युरोपमध्ये 'ॲस्टेरिक्स' आणि 'टिनटिन' तर जपानमध्ये ॲनिमेशनच्या दुनियेत सर्वांत प्रभावशाली नाव म्हणजे 'स्टुडिओ घिबली.' हा स्टुडिओ फक्त जपानी ॲनिमेशनचे प्रतिनिधित्व करीत नाही, तर त्याने जागतिक स्तरावर एका अनोख्या कथाकथन शैलीला जन्म दिला आहे. 'घिबली' जपानमधील सुप्रसिद्ध ॲनिमेशन स्टुडिओंपैकी एक आहे. हा स्टुडिओ सुंदर हाताने रेखाटलेल्या ॲनिमेशनसाठी आणि मनाला भिडणाऱ्या कथाकथनासाठी ओळखला जातो. घिबली स्टुडिओची स्थापना १९८५ मध्ये हयाओ मियाझाकी आणि इसाओ ताकाहाता या दोन दिग्दर्शकांनी केली. या स्टुडिओने सर्वोत्कृष्ट ॲनिमेटेड चित्रपट तयार केले आहेत.

घिबली स्टुडिओची स्थापना करण्यामागील उद्देश असा होता की जपानी ॲनिमेशनच्या माध्यमातून एक नवी आणि कॅलिटेटिव्ह कथा सांगण्याची संधी मिळावी. 'घिबली' हा शब्द इटालियन विमानप्रकार 'घिबली'मधून आला आहे. त्याचा अर्थ 'उत्साही वारा'. 'घिबली'च्या पहिल्या चित्रपटाचे नाव 'कॅसल इन द स्काय' (१९८६). हा चित्रपट जपानमध्ये मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाला आणि घिबलीला एक प्रमुख ॲनिमेशन स्टुडिओ म्हणून ओळख मिळाली. १९८८ मध्ये आलेला 'नाओवाशी' हा एक अत्यंत लोकप्रिय चित्रपट. त्यात एका छोट्या मुलीच्या साहसांची कहाणी चितारण्यात आली आहे. 'स्पिरिटेड अवे' (२००१) या मियाझाकी दिग्दर्शित चित्रपटाने विशेषतः पश्चिमी देशांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रशंसा मिळवली. त्याला ऑस्कर पुरस्कार मिळाला. 'प्रिन्सेस मोनोनोके' (१९९७) हा 'घिबली' स्टुडिओचा चित्रपट पर्यावरणवाद आणि मानवतेच्या संघर्षावर आधारित आहे. 'हाऊल्स मूव्हिंग कॅसल' (२००४) हा चित्रपट लांबल्या वयाच्या पुरुष आणि महिलांच्या संबंधावर आधारित आहे.

तर अशा या घिबली तंत्राचे एव्हाना सायबरविश्वामध्ये झोकात आगमन झाले असून या शैलीत आपले किंवा आपल्याला भावणारे चित्र रूपांतरित करून पाहण्याचे पेव फुटले आहे. त्यामुळे घिबली तंत्र आणि सुरक्षा या अनुषंगानेही विचार, चर्चा पाहायला मिळत आहे. इंटरनेटवर एकदा आपले फोटो सबमिट केले की वापरकर्ते त्या फोटोंच्या वापरावरील नियंत्रण गमावतात. गोपनीयता धोरण सांगते की वापरकर्ता सबमिट करत असलेले फोटो इनपुट मॉडेल प्रशिक्षणासाठी वापरले जाऊ शकतात. ही भविष्यासाठी धोक्याची घंटा आहे, असेदेखील पोस्टमध्ये सांगण्यात आले आहे. याचे कारण फोटो अपलोड केल्यानंतर त्यावर तुमचा अधिकार राहत नाही. तुमचा फोटो अन्य कामांसाठीदेखील वापरला जाऊ शकतो. म्हणजेच गोपनीयतेचे उल्लंघन होऊ शकते. दुसरी बाब म्हणजे तुम्ही अपलोड केलेल्या फोटोंचा गैरवापर करून ओळख चोरली जाऊ शकते. यामुळे तुमची खाजगी माहिती सुरक्षित राहू शकत नाही आणि तुम्ही हॅकिंगला बळी पडू शकता. ओपन एआय कंपनीने चॅटजीपीटीचे एक नेटिव्ह इमेज जनरेशन फीचर लाँच केले आहे. आपण जसे पूर्वीपासून ॲनिमेशन आणि कार्टूनमध्ये फोटो पाहतो तसेच यात आपले फोटो बनवू शकतो. साहजिकच आपल्या मनात ही शैली वापरून असे फोटो बनवायचे कसे ही उत्सुकता निर्माण होते. त्यासाठी आपण चॅटजीपीटीच्या प्रीमियम मॉडेलचा वापर करू शकतो. आपल्याला डेस्कटॉप किंवा मोबाईलवर चॅटजीपीटी उघडावे लागेल. तेथील अधिक चिन्हावर क्लिक केल्यावर फोटोज हा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करून घिबली शैलीत बनवायचे फोटो निवडता येतात. फोटो अपलोड झाला की संबंधित कमांड द्यावी लागेल. त्यासाठी विविध पर्याय मिळतील. पण चॅटजीपीटीचा वापर करण्यासाठी १८०० रुपये म्हणजे जवळपास २० डॉलर्स एवढी रक्कम मोजावी लागते. पण असेही काही पर्याय आहेत, ज्याद्वारे घिबली शैलीतील आकर्षक फोटो बनवता येतात. त्यासाठी सोपे पर्याय म्हणून ग्रॉकएआय आणि मिड जर्नी ही माध्यमे वापरता येतात. तिथे चित्र बनवण्याची पद्धत चॅटजीपीटी सारखीच सोपी आहे. ग्रॉक एआय चॅटजीपीटीमध्ये घिबली शैलीमधील प्रतिकृती वैशिष्ट्य समाविष्ट केले आहे. याद्वारे एआय जनरेटेड प्रतिमांना चांगला प्रतिसाद मिळत आहे.

चॅटजीपीटीद्वारे जवळपास प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या फोटोंचे ॲनिमेशन बनवू शकते. चॅटजीपीटीव्यतिरिक्त क्रेल्योन, प्ले ग्राऊंड एआय, ग्रॉक आणि डीपएआयसारख्या मोफत प्लॅटफॉर्मवरूनही घिबली शैलीचे फोटो बनवता येतात. मात्र जीपीटी ४ प्रमाणे ही टूल्स हुबेहूब फोटो तयार करू शकत नाहीत. घिबली आर्टमुळे सर्वत्र खळबळ उडवून दिली असली तरी घिबली स्टुडिओचे सहसंस्थापक नियाघाडी हैयायो यांनी याबद्दल खंत व्यक्त केली आहे. ▮

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# 'मुद्रा'ची दशकपूर्ती

मराठी तरुणांचे हात हे नोकरी मागणारे न होता, नोकऱ्या देणारे मराठी तरुण राज्यात घडावे अशी इच्छा अनेकदा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली आहे. उद्योग क्षेत्रात येऊन युवकांनी विकासाच्या नव्या वाटा पादाक्रांत कराव्यात हेच आजवर अनेकदा काँग्रेसच्या काळात सांगितले जात होते. मात्र युवकांना उद्योग क्षेत्रात पाऊल ठेवताना नेहमी भांडवलाची अडचण भासत होती. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्योजकांना सक्षम करण्यासाठी पीएम मुद्रा योजना आणली आणि बघता बघता या योजनेची दशकपूर्ती झाली आहे. उद्योग क्षेत्रात येऊ पाहणाऱ्या तरुणांना या योजनेच्या माध्यमातून सरकारने मदतीचा हात दिला आणि दहा वर्षांत तब्बल ५२ कोटी ३३ लाख व्यावसायिकांना या योजनेच्या माध्यमातून कर्ज मिळाले. पीएम मुद्रा योजनेमुळे मागील दहा वर्षांत कोट्यवधी लोकांचे जीवन बदलले. त्यांची स्वप्ने साकार झालीत. ज्याना पूर्वी दुर्लक्षित केले गेले, त्यांना आर्थिक मदत देऊन सक्षम करण्यात आले. देशातील लघु उद्योजक, छोटे दुकानदार यांना पूर्वी कर्ज मिळविण्यासाठी बँकेचे उंबरठे झिजवावे लागायचे. मात्र मोदी सरकारने मुद्रा योजना लागू करून युवकांच्या उद्योजक बनण्याच्या प्रवासाला एकप्रकारे दिशा दिली आहे. मुद्रा योजनेमुळे ज्या युवकांनी उद्योग क्षेत्रात पाऊल ठेवून आपले जीवनमान बदलविले आहे, त्या सर्वांचे योजनेच्या दहा वर्षाच्या पूर्णत्वानिमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिनंदनही केले आहे. या योजनेमुळे काहीही अशक्य नाही, कुठलीही महिला, कुठलाही युवक, कुठलीही युवती रोजगार करून आपले जीवन बदलवू शकते, हे सिद्ध झाले झाले आहे. या योजनेने अनेकांना रोजगार दिला आहे.

युवकांसाठी मुद्रा योजना अतिशय मोलाची आणि महत्त्वपूर्ण ठरली आहे. केंद्र सरकारने बँकांच्या माध्यमातून २२ कोटींहून अधिक लाभार्थींना ३३ लाख कोटी रुपयांपर्यंत तारणमुक्त कर्ज वितरित केले आहे. यातील ७० टक्के लाभार्थी महिला आणि अनुसूचित जाती जमाती व इतर मागासवर्गीय समुदायातील आहेत. या योजनेमुळे अनेकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मदत झाली. आणि तळागळातील लोकांना सक्षम करता आले. मुद्रा योजनेच्या माध्यमातून विकासाच्या नवीन युगाची सुरुवात झाली. युवा उद्योजकांना सक्षम करणे हा पीएम मुद्रा योजनेचा मुख्य उद्देश आहे. आणि यातील लाभार्थींची संख्या लक्षात घेता ही योजना खऱ्या अर्थाने नवीन युगाची सुरुवात करणारी महान योजना ठरली आहे. या योजनेच्या माध्यमातून कर्ज घेणाऱ्या बहुतांशी महिला असून सर्वांत जलदगतीने कर्ज फेडणाऱ्यांमध्ये त्यांचा समावेश आहे. कुठल्याही हमीशिवाय या योजनेच्या माध्यमातून देशातील तरुणांना ३३ लाख कोटी रुपयांचे कर्ज देण्यात आले आहे. देशातील अधिकाधिक तरुणांनी व्यवसाय सुरू करावा अशी खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची इच्छा आहे. आणि याच इच्छापूर्तीसाठी त्यांनी मुद्रा योजना अधिक बळकट करण्याचे ठरविले आहे. सरकार व्यावसायिकांना सर्वतोपरी मदत करण्यासाठी तयार आहे, असा विश्वासही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या योजनेच्या माध्यमातून दिला आहे. मुद्रा योजनेतून देशातील जनतेला कुठल्याही हमीशिवाय ३३ लाख कोटी रुपये देण्यात आले. हा अतिशय स्तुत्य उपक्रम असून या योजनेमुळे देशात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती झाली असून, या योजनेच्या लाभार्थींनी अर्थव्यवस्था वाढीसाठी मोठी मदत केली आहे. ही योजना देशात लागू होऊन दहा वर्षांचा कालावधी पूर्ण झाला असून अनेकांनी या योजनेच्या माध्यमातून आपल्या आयुष्याची आर्थिक घडी नीट बसविण्यासाठी प्रयत्न केले. ज्या तरुणांनी या योजनेच्या माध्यमातून प्रामाणिक प्रयत्न करीत आपला उद्योग वाढविण्यासाठी भर दिला आणि उद्योजक म्हणून युवा पिढी देशात नावारूपास आली, त्या तरुण उद्योजकांना खरंच सलाम करायला पाहिजे. हाताला काम नाही म्हणून अनेक तरुण वैफल्यग्रस्त झाले आहेत. अनेक तरुण रिकामे घरी बसून आहेत. अशा तरुणांनी मुद्रा योजनेचा लाभ घेऊन आपले आर्थिक जीवनमान उंचाविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मुद्रा योजना अतिशय सुलभ असून, या योजनेचा लाभ घेऊन तरुणांना उद्योजक बणण्याची संधी लाभली आहे. या संधीचा महाराष्ट्रातील युवकांनी लाभ घेण्याची गरज आहे. प्रत्येकाला नोकरी देणे आता सरकारच्याही हातात राहिले नाही. स्पर्धेच्या या युगात शासकीय निमशासकीय नोकऱ्या मिळणे कठीण झाले आहे. त्यामुळे घरात बसून रिकामे न राहता मुद्रा योजनेचा लाभ घेऊन उद्योग क्षेत्रात मराठी युवकांनी येण्याची आता गरज आहे. मराठी युवकांनी खरंच नोकऱ्या देणारे हात निर्माण केले पाहिजे. नौकर म्हणून आयुष्य घालविण्यापेक्षा मालक बनून आर्थिक जीवनमान सुधारण्याची संधी देणारी एकमेव योजना म्हणजे पीएम मुद्रा योजना आहे. या योजनेचा दहा वर्षांतील कार्यकाळ बघता ही योजना अनेकांचे आयुष्य बदलवून टाकणारी ठरली आहे. या योजनेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानावे तेवढे कमीच आहे. ▮

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# वक्फ कायदा मोदी सरकारची सर्वोच्च उपलब्धी

देशाच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करणारे वक्फ दुरुस्ती विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात बहुमताने पारित झाले. यासंदर्भातील अधिसूचनेवर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वाक्षरी केल्यामुळे त्याचे कायद्यातही रूपांतर झाले आहे. मोदी सरकारची आतापर्यंतची ही सर्वांत मोठी उपलब्धी मानली जात आहे.

याआधी मोदी सरकारने जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम निष्प्रभ केले, तीन तलाक बेकायदेशीर ठरवला, त्याचप्रमाणे अयोध्येतील रामजन्मभूमीवर भव्यदिव्य राममंदिर बांधण्याचा मार्ग प्रशस्त करण्यापर्यंत अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले आहेत. त्याच मालिकेतील हा निर्णय म्हटला पाहिजे. भाजपा आणि संघपरिवाराला तसेच देशातील कोट्यवधी हिंदूंना अपेक्षित असे अनेक निर्णय मोदी सरकारने चुटकीसरशी घेतले आहे. त्यामुळे यानंतर देशातील राष्ट्रभक्त नागरिकांना सुखावणारा मोदी सरकारचा पुढील निर्णय कोणता राहील याबाबत उत्सुकता निर्माण होणे स्वाभाविक आहे.

३७० कलम निष्प्रभ करण्याचा आणि तीन तलाक बेकायदेशीर ठरवण्यापेक्षा वक्फ दुरुस्ती विधेयक पारित करण्याचा निर्णय मोदी सरकारसाठी आव्हानात्मक होता. कारण यावेळी मोदी सरकारला पूर्ण बहुमत मिळाले नाही. लोकसभेत तर भाजपा आणि मित्रपक्षांचे स्पष्ट बहुमत होते, पण राज्यसभेत भाजपाचे काठावर बहुमत होते. त्यामुळे वक्फ दुरुस्ती विधेयक राज्यसभेत पारित करून घेणे ही मोदी सरकारसाठी एकप्रकारची अग्निपरीक्षा होती. मात्र या अग्निपरीक्षेत मोदी सरकार नुसतेच नाही तर प्रावीण्याने उत्तीर्ण झाले.

२०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला स्वबळावर स्पष्ट बहुमत मिळाले होते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मात्र भाजपाचा विजयरथ अनपेक्षितपणे २४० वर अडकला. स्वबळावर २७२ हा स्पष्ट बहुमताचा आकडा भाजपाला गाठता आला नाही. तेलगू देसम, जनता दल संयुक्त, राष्ट्रीय लोकदल, लोकजनशक्ती पक्ष, हिंदुस्थान अवाम मोर्चा तसेच धर्मनिरपेक्ष जनता दल या मित्रपक्षांच्या मदतीने भाजपाला सरकार स्थापन करावे लागले. त्यामुळे मोदी सरकारला यावेळी आपल्या मनासारखे राष्ट्रवादी निर्णय घ्यायला अडचणी येतील असे सुरुवातीला वाटले होते.

सरकारला पाठिंबा देणारे मित्रपक्ष आपल्या पाठिंब्यांची मनमानी किंमत वसूल करतील, असेही अनुमान होते. सरकारला पाठिंबा देणारे मित्रपक्ष मोदी सरकारला आपल्या तालावर नाचवतील, राष्ट्रवादी निर्णय घेण्यात अडथळा आणतील, असाही अंदाज होता. पण मोदी यांनी ते सर्व खोटे ठरवले. बहुमतात असताना मोदी सरकार जसे धडाडीचे निर्णय घेत होते, तसेच निर्णय आता अल्पमतात असतानाही घेत आहे. मोदींना कोणी आपल्या तालावर नाचवू शकत नाही. उलट मोदी म्हणतील तसेच मित्रपक्षांना नाचावे लागेल, हे वक्फ दुरुस्ती विधेयकावरील मतदानातून दिसून आले.

वक्फ दुरुस्ती विधेयकाला भाजपाच्या जवळपास सर्वच मित्रपक्षांचा विरोध होता. कारण या बहुतांश पक्षांचे राजकारण मुस्लिम मतांच्या आधारावर चालत होते आणि चालत आहे. त्यातच या वर्षाच्या अखेरीस बिहारमध्ये विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्यामुळे काही राजकीय पक्षांसाठी वक्फ दुरुस्ती विधेयकाला पाठिंबा देणे राजकीयदृष्ट्या अडचणीचे होते. मात्र मोदी सरकारचे चाणक्य केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी भाजपाच्या सर्व मित्रपक्षांना विधेयकाच्या बाजूने मतदान करायला तयार केले. त्यामुळे लोकसभेत विधेयकाच्या बाजूने २८८ मते पडली. राज्यसभेतही विधेयकाच्या बाजूने १२८ जणांनी मतदान केले. हा राजकीय चमत्कार म्हटला पाहिजे. वक्फ दुरुस्ती विधेयक विनाअडथळा पारित होईल, याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी पूर्णपणे आश्वस्त होते. त्यामुळे विधेयकावर लोकसभेत तसेच राज्यसभेत चर्चा आणि मतदान सुरू असताना मोदी श्रीलंका आणि थायलंडच्या दौऱ्यावर निघून गेले. एखाद्या मुद्यावर आपल्या सहकाऱ्यांवर विश्वास कसा टाकायचा हे मोदी यांनी यातून दाखवून दिले. त्यामुळे वक्फ दुरुस्ती विधेयक पारित होणे ही मोदी सरकारची आतापर्यंतच्या कार्यकाळातील सर्वांत मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे.

राष्ट्रवादी संघटनांचा जो एजेंडा होता, तो आतापर्यंत जवळपास ८० टक्के पूर्ण झाला आहे. आता फक्त मोदी सरकारच्या दोन-तीन निर्णयांकडे सगळ्यांचे लक्ष राहणार आहे, ते म्हणजे समान नागरी कायदा आणि गोहत्या बंदी. उत्तराखंड सरकारने त्याची सुरुवात केली आहे. समान नागरी कायदा लागू करणारे उत्तराखंड देशातील तसेच भाजपाशासित म्हणूनही पहिले राज्य ठरले आहे. गुजरातनेही समान नागरी कायद्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे. अयोध्येत राममंदिर झाल्यानंतर मथुरेतेही कृष्णजन्मभूमी तसेच काशी विश्वनाथ मंदिराबाबतची जुनी घोषणा पूर्ण होणार का, याबाबत उत्सुकता निर्माण होणे स्वाभाविक आहे. समान नागरी कायद्यानंतर सगळ्यांचे लक्ष आता नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स(एनआरसी) कडे राहणार आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी २०२० मध्ये लोकसभेत बोलताना पूर्ण देशात एनआरसी लागू करण्याची घोषणा केली होती. विशेष म्हणजे २०१३ मध्ये सर्वोच्च न्यायालयानेच एनआरसीची आवश्यकता प्रतिपादित केली होती.

जवळपास आपल्या ११ वर्षांच्या कार्यकाळात मोदी सरकारने जेवढे राष्ट्रवादी निर्णय घेतले, तेवढे याआधी कोणत्याच सरकारला घेता आले नाहीत. त्या सरकारांनी मतांच्या राजकारणासाठी तशी हिंमत केली नाही आणि दाखवलीही नाही. बिहारमध्ये यावर्षीच्या अखेरीस विधानसभा निवडणूक असल्यामुळे मोदी सरकार वक्फ दुरुस्ती विधेयक लांबणीवर टाकेल, अशीही चर्चा होती. पण व्यापक समाजहित आणि राष्ट्रहितासमोर आम्ही राजकीय हित पाहात नाही, हे मोदी सरकारने दाखवून दिले. आधी देश, मग पक्ष आणि सर्वांत शेवटी व्यक्ती ही भाजपाची विचारधारा आहे. देशाच्या हिताचा निर्णय घेताना पक्षाच्या हिताचा विचार करायचा नाही, हे वक्फ दुरुस्ती विधेयकातून मोदी सरकारने दाखवून दिले. विशेष म्हणजे हे विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांत सरकारने व्यापक चर्चेनंतर पारित होऊ दिले. दोन्ही सभागृहांत चर्चेसाठी प्रत्येकी आठ तासांचा वेळ ठरला असताना तेरा, चौदा तास चर्चा झाली. ज्यांना ज्यांना या विधेयकावर बोलायचे होते, अगदी विरोधात बोलायचे होते, त्यांनाही बोलण्याची संधी मिळाली. तरीही संसदेने हे विधेयक घाईगर्दीने आणि जबरदस्तीने पारित केले, असा हास्यास्पद आरोप काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांनी संसदभवन परिसरात केला. सोनिया गांधींनी यासाठी बुलडोझ असा शब्द वापरला. विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी तर गांधी घराण्याच्या प्रतिनिधी म्हणून प्रियांका वढेरा यांनी लोकसभेत तर सोनिया गांधी यांनी राज्यसभेत या विधेयकावर बोलायला पाहिजे होते, विधेयकाला विरोध करायला पाहिजे होता. पण या विधेयकावर बोलायची हिंमत या तिघांची झाली नाही. त्यामुळे हे विधेयक घाईगर्दीत आणि जबरदस्तीने पारित झाले, असा आरोप करायला सोनिया गांधींना तोंडच नाही, कारण त्यांनी राज्यसभेत आपले तोंड उघडलेच नाही. या विधेयकावरील मतदानाने देशात राष्ट्रवादी पक्ष आणि राष्ट्रविरोधी पक्ष सरळसरळ उभी फूट पडली आहे. याची किंमत राष्ट्रविरोधी पक्षांना दीर्घकाळ चुकवावी लागणार आहे. ▮

९८८१७१७८१७

### महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना श्रेणी सुधारची संधी मिळावी

गोंडवाना विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना श्रेणी सुधार करण्यासाठी संधी मिळावी असा विद्यार्थिहिताचा प्रस्ताव विद्यापीठाच्या सिनेट सदस्यांनी अधिसभेत (सिनेट) नुकताच मांडला व तो सर्वानुमते मंजूर सुद्धा करण्यात आला. श्रेणी सुधाराची संधी लागू झाल्यास अनेक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मोठा फायदा होईल, प्रस्तावाबद्दल व एकमताच्या मंजुरीबद्दल सर्व सदस्यांचे अभिनंदन. यानिमित्ताने श्रेणी सुधार हा विषय चर्चेला आला. मुळात दहावी, बारावीमधील विद्यार्थ्यांना श्रेणी सुधाराची (पुन्हा परीक्षा देऊन गुण/टक्के सुधारण्याची-वाढवण्याची संधी) संधी मिळते. परंतु विद्यापीठातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सुद्धा अशी सुविधा आहे? अशी अनेकांना खबर सुद्धा नाही. असेल तर त्याची माहिती, त्याच्या नियमावलीचा थांगपत्ता नाही. अनेक स्पर्धा परीक्षा, खाजगी संस्था, कंपनी किंवा अनेक ठिकाणी पुढील शिक्षणासाठी किंवा नोकरीसाठी शैक्षणिक गुण/टक्केची अट मागितली असते. एखाद्याला काही कारणाने अपेक्षित गुण/टक्के मिळवता आले नाही, आरोग्याच्या कारणाने किंवा आपत्कालीन परिस्थितीमुळे परीक्षेत उत्तीर्ण होऊन सुद्धा कमी गुण/टक्के मिळाले तर त्याला पुन्हा एकदा त्याच परीक्षेला पाहिजे असलेल्या विषयाच्या परीक्षेला बसण्याची संधी मिळावी त्यातून आपल्या गुणांत/टक्केवारीत सुधार, वाढ करण्याची संधी मिळावी असा हा या श्रेणी सुधार सुविधेचा फायदा. परंतु या सुविधेची अनेक विद्यार्थ्यांना सोडा परंतु अनेक प्राध्यापकांना, विद्यापीठात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुद्धा माहिती नसते,आणि ज्यांना माहिती आहे त्यांना त्याची पद्धत आणि नियमावली माहिी नसते. खरंतर अशा सुविधेची माहिती प्रत्येक अभ्यासक्रमाच्या अध्यादेश, मार्गदर्शिकेत द्यायला हवी. महाविद्यालयामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना श्रेणी सुधार सुविधेची संधी मिळावी यासाठी योग्य ती नियमावली व स्पष्टता येणे आवश्यक आहे.

**वैभव बावनकर**/९५४५७४५५८०

●● ●●

### खंत नको, नको पश्चात्ताप

परमेश्वराने माणसाला माणूस म्हणून जन्माला घातले, हेच खरे माणसाचे भाग्यवान असल्याचे प्रमुख लक्षण आहे. आपण भाग्यवान आहोत या गोष्टीची जाणीव सदैव असायला हवी आणि अंतिम श्वासापर्यंत देवघरातील पणतीप्रमाणे ती तेवत ठेवायला हवी. तेव्हाच आपल्या हातून देशकार्य, धर्मकार्य, सत्कार्य घडेल आणि आपण आजन्म भाग्यवान असल्याची अनुभूती येईल. आजच्या काळात प्रत्येक माणसाच्या मनात दुसऱ्याला न सांगता येणारी एक खंत आहे आणि कुण्या तरी एका गोष्टीचा पश्चात्ताप मनात ठाण मांडून बसला आहे. त्यामुळे आपल्याला वाटतं, आपण घेतलेले निर्णय चुकले काय?

भूतकाळात जर आपण तसे केले असते, तर आज असे झाले असते. माझ्या आयुष्यात मला हवं तसं घडलं असतं तर माझ्यासारखा भाग्यवान मीच, पण प्रत्यक्ष जीवनात, जर तरच्या भावनांना अर्थ नसतो. कारण मानवी आयुष्यात जे परमेश्वराला घडवायचं असतं तेच नेमकं घडतं. हे समाजात घडत असलेल्या अकल्पनीय, अविश्वसनीय घटनांवरून लक्षात येते.

स्वतःच्या रंग, रूप, शारीरिक ठेवण, बुद्धिमत्ता याविषयी मनात एक खंत ही दडलेली असेल, पण तीव्र इच्छा अून देखील तुम्ही यापैकी काहीही एक बदलवू शकले नाहीत. जे काही प्राप्त झाले ते त्या स्वरूपातच निमूटपणे स्वीकारावे लागले, यालाच म्हणतात प्रारब्ध. जे कुणीही बदलवू शकत नाही. माझ्या मतानुसार प्रत्येक माणसाचा जन्म एका विशिष्ट कार्यासाठी झाला असावा असे वाटते. कारण त्रेतायुगात धर्मरक्षक श्रीप्रभू रामचंद्राचा जन्म राक्षसांचा संहार करण्यासाठी व धर्मरक्षणासाठी झाला होता व त्या युगातील माणसांचा जन्म रामकार्य पूर्णत्वास नेण्यासाठी झाला होता असा अर्थपूर्ण विचार केला तर आपला जन्म सुद्धा प्रभू कृपेने एका विशिष्ट कार्यासाठी झाला आहे. हा दृढ विश्वास ठेवायला हरकत नाही.

**विजय शंकरराव इंगोले**/जुनी वस्ती, बडनेरा

## वाचक पत्रे

●● ●●

### घरच शासकीय देखरेखीत बांधून द्यावे!

घरकूल लाभार्थींसाठी पाच ब्रास मोफत वाळू उपलब्ध करून देण्यात निर्णय शासनाने घेतलाय खरा, निर्णय स्तुत्य आहे याबद्दल वाद नाही परंतु एवढ्या तुटपुंज्या वाळूत घर तयार होईल का हा खरा प्रश्न आहे. शिवाय चढत्या महागाईत, घर साहित्याचे वाढते दर, बांधकाम कारागीर, मजुरांची मजुरी हे सारे पाहता आवास योजनेतून मिळणारे मंजूर अनुदान इतके अल्प ठरते की कितीही ओढून ताणून घर बसविण्याचा प्रयत्न केला तरी अपुऱ्या अनुदानामुळे घराचे काम काहीतरी अपूर्ण राहते, साहजिकच त्या गरिबाला घर पूर्ण न झाल्याचा मनस्ताप तर होतोच, त्याची केविलवाणी परिस्थिती होते आणि आनंदाऐवजी विवंचना मात्र सतावत राहते. म्हणूनच एक तर लाभार्थींना योजनेअंतर्गत शासनस्तरावर परिपूर्ण घरच तयार करून त्यांच्या स्वाधीन केल्यास लाभधारकास विवंचना, चिंता, काळजी राहणार नाही अथवा आजच्या महागाईनुसार, घरसाहित्याचा बाजारभाव विचारात घेऊन निदान अनुदानात वाढ करण्यात आल्यास ते त्याला सुसह्य होईल. परिपूर्ण झालेल्या घराचे समाधान, आनंद मिळेल अशी अपेक्षा. ▮

**विश्वनाथ पंडित**/९५८८४५०४४२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# दर्जेदार रस्त्यांमुळे शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ उपलब्ध होणार

## विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांचे प्रतिपादन, हत्ता येथे सभापती, मंत्री शिवेंद्रराजे भोसले भव्य नागरी सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० एप्रिल**

हत्ता-साखरा-तळणी-सिंदगी या राज्य रस्त्याचे काम कमी वेळात पूर्ण करण्यात येणार असून हा रस्ता दर्जेदार होणार आहे. दर्जेदार रस्त्यामुळे कमी वेळात वाहतुकीची सुविधा उपलब्ध होणार असल्यामुळे येथे उत्पादित दूध, भाजीपाला, यासह इतर कृषी उत्पादनांना अधिकचा दर व उत्पादकाकडून ग्राहक, उपभोक्त्याला ताजा माल मिळण्याची सोय होणार आहे. यासोबतच शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ उपलब्ध होणार असल्याचे प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आज हत्ता येथील कार्यक्रमात केले.

सेनगाव तालुक्यातील हत्ता येथे आज हत्ता-साखरा-तळणी-सिंदगी या राज्य रस्त्याचे भूमीपूजन विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्या हस्ते आज कोनशिलेचे अनावरण करुन करण्यात आले. यावेळी आमदार तानाजी मुटकुळे, आमदार संतोष बांगर, माजी आमदार रामराव वडकुते, माजी आमदार गजानन घुगे उपस्थित होते.

पुढे बोलतांना प्रा. शिंदे म्हणाले, या राज्यमार्गामुळे हत्ता - साखरा - तळणी - सिंदगी गावांच्या मूलभूत विकासासाठी रस्त्याचे बांधकाम हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे येथील दळणवळणाच्या सोयीसुविधांमध्ये वाढ होत असून, या रस्ता बांधकामामुळे गावाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण बदल घडून येणार आहे. हिंगोली - सेनगाव - रिसोड तसेच जिंतूर सेनगाव -रिसोड अशा पद्धतीने मराठवाडा विदर्भाला नव्या मार्गाने जोडले जाणार आहेत. छोटी गावे शहरांना आणि इतर गावांशी जोडल्यामुळे स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात, असेही प्रा. शिंदे यांनी सांगितले. या रस्त्यामुळे स्थानिक पातळीवरच युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. बहुमतात असलेले सरकार असल्यामुळे गोरगरीब, शेतकरी, मध्यमवर्गीय कोणत्याही योजनांपासून वंचित राहणार नाहीत, अशी मुख्यमंत्र्यांनी भूमिका घेतली आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी सुरुवातीचे १०० दिवस कृती आराखडा अंमलबजावणी कार्यक्रम प्रत्येक विभागाकडून राबविण्याचे निर्देश दिले असून, त्यासाठी पाठपुरावा करत असल्याचे सांगून जलसंधारण मंत्री असताना बंधारे बांधून जलसंधारणाचा अनुशेष भरून काढण्याचे काम केले असल्याचे सांगितले. यापुढेही हिंगोली जिल्ह्याचा उर्वरित अनुशेषही भरून काढण्यात येईल, असे सांगून त्यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण, प्रधानमंत्री सौरघर योजनी, कृषी वीज बील शुन्य आदी राज्य शासनाच्या योजनांची माहिती विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिली.

शेतकऱ्यांप्रती तळमळ असणारे, सर्वांगीण विकास, विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, यासाठी झटणारे आमदार तान्हाजी मुटकुळे हे आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येक जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्याचे काम हाती घेतले आहे. त्यामुळे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनामध्ये सन्मान निर्माण केल्याचे काम केले असल्याचे सांगून जिल्ह्याच्या विकासासाठी आवश्यक त्या सुखसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी महत्वाची भूमिका पार पाडण्याचे काम करण्यात येईल, असे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी सांगितले.

सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवजेंद्रसिंह राजे भोसले म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरा पगड जातींच्या सर्व लोकांना सोबत घेत स्वराज्य स्थापनेसाठी प्रयत्न केले. त्यामुळे मराठी माणूस म्हणून आपण सर्व एक आहोत, हे लक्षात घेतले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता अहिल्यादेवी होळकर या दोघांनीही त्यांच्या राजवटीत जनतेच्या कामाला प्राधान्य दिले. त्याचप्रमाणे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि आपण दोघेही या रस्ता भूमिपूजनाचे काम करत आहोत. या रस्त्यामुळे ग्रामीण भागात वाहतूक सुलभ होणार आहे. व्यापार आणि वाणिज्य वाढविण्यासाठी, आरोग्य सेवा आणि आपत्कालीन सेवा मिळविण्याच्या कालावधीत बचत होते. या राज्य मार्गामुळे गावाच्या विकासात आणि ग्रामीण जीवन सुधारण्यासाठी मोठे योगदान मिळणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांनी सांगितले.

या रस्ता कामाचा दर्जा उच्च राहील, त्याबाबत सक्त सूचना दिल्या आहेत. मंत्री म्हणून मंत्रालयात न थांबता राज्यात फिरून जनतेची कामे करण्यात येतील. तसेच मुबलक प्रमाणात आवश्यक तेवढा निधी पुरवठा केला जाईल. त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेच्या विकासासाठी, पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी, त्यांच्या दळणवळणाच्या आवश्यक गरजा भागविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामासाठी १०० टक्के निधी देण्याचा प्रयत्न केला जाईल. या भागातील पाणीप्रश्नही सोडविण्यात येतील. आपल्या हक्काचे असलेले पाणी मिळविण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करण्यात येईल, असे सांगून केंद्रातील प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि राज्यातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील हे राज्य शासन तितक्याच ताकदीने काम करत आहे, असेही छत्रपती भोसले यांनी यावेळी सांगितले.

यावेळी आमदार तानाजी मुटकुळे म्हणाले की, या महत्त्वपूर्ण रस्ता कामाचे भूमिपूजन झाले असून, हिंगोली जिल्ह्यातील सुवर्णाक्षरात लिहण्यासारखा क्षण आहे. या भूमीपूजन कार्यक्रमास दोन राजघराण्यातील वंशज येथे आले आहेत. महाराष्ट्र हिताचे काम सुरू आहे. जिल्ह्यातील नरसी नामदेवपासून विविध गावांना जोडणाऱ्या रस्त्यांचे काम होणे आवश्यक आहे, असल्याचे त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

माजी आमदार रामराव वडकुते यांनी २०० कोटी रस्ते भूमिपूजनाच्या निमित्ताने दोन राजे आले आहेत. दोघांचेही स्वागत करुन त्यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त केले. तसेच हत्ता ते औंढा नागनाथ रस्त्यापर्यंतचे ४० किलोमीटरच्या कामास मंजुरी द्यावी, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

या कार्यक्रमास परिसरातील पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंगोली शहरात महावीर जयंती भव्य मिरवणूकीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० एप्रिल**





येथील जैन धर्मीयांकडून भगवान महावीर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील प्रमुख रस्त्यावरून भव्य मिरवणुक काढण्यात आली. या मिरवणुकीत महिला, पुरूष, तरूण-तरूणी तसेच बच्चे कंपनीनी सहभाग नोंदवला होता.

पोस्ट ऑफीसरोडवरील जैन मंदिरापासून भगवान महावीर यांची प्रतिमा रथामध्ये स्थापीत केल्यानंतर ही मिरवणुक शहरातील जवाहर रोड, गांधी चौक आदी प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. या मिरवणुकीत लेझीम पथक, भजन मंडळी तसेच ढोल ताशांचा समावेश होता. अतिशय आनंदात आणि शिस्तवध्दपणे ही मिरवणुक शहरातून काढण्यात आली. यावेळी समाजातील प्रतिष्ठीत व्यापारी, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कडक उन्हामुळे जागोजागी पिण्याचे पाणी, शरबत तसेच नाश्ता आदींची दानशूर व्यक्तीनी व्यवस्था केली होती. या मिरवणुकीत सहभागी होत भाजपचे आ.तान्हाजीराव मुटकुळे, आ. संतोष बांगर यांनीही भगवान महावीर यांचे दर्शन घेत जैन बांधवांना महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रकाशंचद सोनी यांनी गाळमुक्त तलाव, गाळयुक्त शेत या रथाचे आयोजन केले होते. या रथाला लोकप्रतिनिधींनी भेटी दिल्या. मिरवणुकीत महिलांची उपस्थिती लक्षणीय दिसत होती.



**हिंगोली- सेनगाव तालुक्यातील हत्ता येथे विधान परिषदेचे सभापती प्रा राम शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी आ. रामराव वडकुते, माजी आ. गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, सुरजितसिंग ठाकूर, हिंमत राठोड आदींची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### मुख्याध्यापक संघातर्फे मोरगेवार यांचा सत्कार



हिंगोली- हिंगोली जिल्ह्यातील जांभरुण तांडा येथील प्राथमिक शिक्षक राजकुमार मोरगे यांचे चित्रगाणी हे पुस्तक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे मार्फत अभ्यासक्रमात समाविष्ट केल्याबद्दल हिंगोली जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश स. अंभोरे, मुख्याध्यापक माधव जाधव, नामदेव सरकटे, सिंधू बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गोपाल भोस, गजानन मगर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सखारामजी अंभोरे, संजय गुठे दिलीप धामणे यांची उपस्थिती होती.

### महावीर जयंतीनिमित्त आनंद नगरीचे आयोजन



हिंगोली- जैन धर्मियांचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या २६२३ व्या जन्मकल्याणक महोत्सव निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून शहरातील महावीर भवन येथे सम्यक प्रबोधिनी जैन महिला मंडळ तर्फे दुपारी १ ते ४ शुद्ध जैन रेसीपी (आनंदनगरी) चे आयोजन करण्यात आले होते आनंद नगरीचे उद्घाटन महोत्सवाचे अध्यक्ष रत्नदीपक चवरे सावजी यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी विविध प्रकारचे शुद्ध जैन पदार्थाचे स्टॉल लावण्यात आले होते. यावेळी स्वप्ना दोडल, अश्विनी यंबल, दर्शना कंदी, वंदना सोवितकर, पूजा महाजन, अबोली कान्हेड, माधवी दोडल, बरखा महाजन, नेहा यंबल, पूजा कंदी, भावना कान्हेड, सारिका मास्ट, आदीनी मेहनत घेतली. तसेच त्यानंतर रात्री ८ वाजता पसिद्ध मोटीवेशनल वक्ते डॉ. एस.पि.भारिल्ल यांचे प्रवचन देखील झाले.

### ९४ वाहन चालकांविरूध्द कार्यवाही

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ९४ वाहनचालकाविरूध्द कार्यवाही करीत त्यांचेकडून ६२२०० दंड वसुल करण्यात आला.

# नवीन आर्थिक वर्ष २०२४-२५ चा निधी वितरण २५ एप्रिलपर्यंत करा- कंत्राटदार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० एप्रिल**



सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मार्च नंतरचा निधी हा जून महिन्यात वितरीत होतो. वास्तविक पाहता एप्रील व मे हा काळ उन्हाळ्याचा असल्यामुळे पुर्णपणे रस्ता, पूल व इमारतीची कामे करण्याकरिता अतिशय उपयुक्त आहे. त्यामुळे आपल्या विभागामार्फत निधी वितरण मार्च महिन्याचे अकाउंट एजी ला सबमिट झाल्यानंतर लगेच करण्यात यावा. या दोन महिन्यात सर्व प्रकारची कामे सुरक्षित स्थितीत आणून ठेवण्यास मदत होईल अशी मागणी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचेकडे हिंगोली जिल्ह्यातील कंत्राटदार संघटनेकडून निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

हिंगोली येथे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले आले असता शासकीय विश्रामगृहात कंत्राटदार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांची भेट घेतली. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचीही उपस्थिती होती. यावेळी कंत्राटदार संघटनेच्यावतीने विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. जुनमध्ये पावसाळ्यात निधी वितरण होत असल्यामुळे पावसाळी वातावरणामुळे प्रत्यक्ष कामावर निधी खर्च करण्यास अडचण येते तसेच काम सुरक्षित स्थितीला आणणे कठीण जाते. कंत्राटदारांची अंदाजे तीनशे कोटीची देयके सा बां विभागाकडे दीर्घकल प्रलंबीत आहेत. त्यामुळे ठेकेदारांना आर्थिक व मानसिक त्रास होत आहे. निधी उपलब्ध नसल्याने कामासाठी लागणारे साहीत्य, लेबर व बँकेकडून घेतलेल कर्ज याच्या व्याजाची परतफेड होऊ शकत नाही. त्यामुळे कंत्राटदारांची सुरक्षा ठेव व अतिरिक्त सुरक्षा ठेव परत करण्यात यावी. तसेच ज्या लेखाशिर्षामध्ये निधी उपलब्ध नसल्यामुळे कामे पुर्ण होऊ शकत नाही तशा कामांना सरसकट ३१ मार्च २०२६ पर्यंत भाववाढसह मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे निवेदनावर मयुर कयाल, प्रदीप सोनी, जे एस भाटीया, एस एम शर्मा, ए आर खान आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# हिंगोलीत राष्ट्रवादी काँगेस पक्षाची आढावा बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० एप्रिल**

राष्ट्रवाादी पक्ष अजित पवार गटाच्यावतीने येथील स्व शिवाजीराव देशमुख सभागृहात हिंगोली शहर तसेच विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक आणि सदस्य नोंदणी अभियान दि १० एप्रिल रोजी आयोजित करण्यात आली होती.

यावेळी जिल्हाध्यक्ष बी डी बांगर, नेते प्रकाश थोरात, शहराध्यक्ष केशव दुबे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी जिल्हाध्यक्ष बांगर यांनी जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करून पक्ष संघटन वाढविण्याचे काम करावे गाव तेथे राष्ट्रवादीची शाखा स्थापन करण्याचे आवाहन केले. यावेळी अनेकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. मान्यवरांच्याहस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

# इमारती, रस्ते, पुलाची कामे गुणवत्तापूर्ण करा- शिवेंद्रराजे भोसले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० एप्रिल**



सार्वजनिकबांधकामविभागामार्फत नांदेड प्रादेशिक विभागांतर्गत नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली या चार जिल्ह्यात करण्यात येत असलेल्या इमारत बांधकाम, रस्ते व पुलाच्या बांधकामाची सर्व कामे गुणवत्तापूर्ण होतील याची काळजी घ्यावी. बांधकामाचा दर्जा आणि गुणवत्ता याला प्राधान्य द्यावे, अशा सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज येथे दिल्या. शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रादेशिक आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी आमदार तानाजी मुटकुळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव सदाशिव साळुंके, मुख्य अभियंता श्रीनिवास कातकडे, अधीक्षक अभियंता सलीम शेख, हिंगोलीचे कार्यकारी अभियंता डी. जी. पोत्रे यांच्यासह नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली जिल्ह्यातील सर्व कार्यकारी अभियंता, उपअभियंता आदी यावेळी उपस्थित होते.

नांदेड प्रादेशिक विभागातील सर्व जिल्ह्यातील विविध भागातील रस्ते, इमारतींची काम विहीत कालावधीत पूर्ण करण्यासाठी योग्य नियोजन करावे. या कामांना अभियंत्यांनी भेटी देवून कामांचा दर्जा तपासावा. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत होणारे प्रत्येक काम दर्जेदार होईल, याची दक्षता घ्यावी. रस्त्यांच्या बाजूला, इमारत परिसरात वृक्षारोपण करताना स्थानिक प्रजातींच्या, विशेषतः अधिक प्रमाणात सावली देणाऱ्या वृक्ष लागवडीला प्राधान्य द्यावे, असे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. भोसले यावेळी म्हणाले. तसेच कार्यालयीन स्वच्छता, आधुनिक तंत्रज्ञानाचा कामकाजात वापर आदी बाबींकडे विशेष लक्ष द्यावे, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या १०० दिवसांच्या सात कलमी कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागाने राबविलेल्या विविध उपक्रमांचीही माहिती यावेळी मंत्री श्री.भोसले यांनी घेतली. तसेच आमदार मुटकुळे यांच्या प्रस्तावित कामाचा समावेश करुन मान्यतेसाठी सादर करावेत, अशा सूचना केल्या.

यावेळी आमदार तानाजी मुटकुळे यांनी हिंगोली जिल्ह्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा व प्रस्तावित कामांना मान्यता द्यावी, अशी मागणी बैठकीत केली.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता श्रीनिवास कातकडे यांनी नांदेड प्रादेशिक विभागातील सर्व जिल्ह्यात सुरू असलेल्या रस्ते, पूल व इमारत बांधकामांची माहिती दिली. तसेच कामे दर्जेदार करण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या शासन निर्णयात बदल करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. यासोबतच रस्त्यांवरील खड्डे बुजविणे व इतर दुरुस्तीची कामे करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com









बीड शहरात खराब रस्त्यापेक्षा नव्या जुन्या रस्त्यामधील पॅच, एक रस्ता खाली तर दुसरा एक फूटवर, रस्त्यावर मोठं मोठे गतिरोधक, ज्याला वाटेल तो रस्ता खोदून तसाच ठेवतोय यामुळे वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे. (छाया कृष्णा शिंदे)

## दत्त संस्थान बालाघाट येथे चैत्र शुद्ध पौर्णिमा व हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरी होणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० एप्रिल**



येथे जवळ असलेले श्री दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे शनिवार दि.१२ एप्रिल २०२५ रोजी प.पु.ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने, दत्त उपासक श्री.वैजनाथ महाराज शिंदे यांच्या अधिपत्याखाली चैत्र शुद्ध पौर्णिमा व हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा होणार आहे. या जन्मोत्सव सोहळ्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. तसेच मासिक पौर्णिमेनिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेली आहे.

पंचक्रोशीतील भाविक भक्तांना नम्र विनंती आहे की या चैत्र शुद्ध पौर्णिमा व हनुमान जन्मोत्सवला उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा. असे आवाहन दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) व महादेव अण्णा शेलार रा.शिवाजीनगर (उदंडवडगाव) यांनी केले आहे.

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे शनिवारी सोपान म. इंगळे शास्त्री यांचे कीर्तन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० एप्रिल**



विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील आठवी पुण्यतिथी चैत्र शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. सोपान महाराज इंगळे शास्त्री अध्यक्ष इंगळे महाराज परमार्थ आश्रम चिंचवड गाव यांचे शनिवार दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व गंगाधर श्रीमंतराव घुमरे, रमेशभाऊ विश्वनाथ घुमरे, बाळासाहेब विश्वनाथ घुमरे, अण्णासाहेब तुकाराम लांडे यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भाद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

## राजकिशोर मोदी यांच्याकडून जगाला भगवान श्री महावीर यांच्या प्रतिमेचे पुजन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजागोई दि.१० एप्रिल**

संपूर्ण जगाला अहिंसेचा संदेशासोबतच अहिंसेच्या मार्ग दाखवणाऱ्या भगवान श्री महावीर यांच्या जयंतीनिमित्त आज अंबाजोगाई शहरात निघालेल्या भगवान श्री महावीर यांच्या भव्यदिव्य अशा मिरवणुकी दरम्यान महावीर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन शहरातील सर्व जैन बांधवांस भगवान श्री महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या.या मिरवणुकीत अंबाजोगाई शहरातील सर्व जैन महिला व पुरुष पारंपरिक वेशभूषा परिधान करून सहभागी झाले होते.



यावेळी राजकिशोर मोदी यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की जगाला अशांती व हिंसेच्या प्रवृत्ती पासून दूर नेण्यासाठी भगवान श्री महावीर यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. वयाच्या २१ व्या वर्षी त्यांच्या आई वडीलांचे निधन झाले. त्यानंतर त्यांनी ध्यान धारणा व तपस्या प्रारंभ केली. त्यानंतर धर्म व अहिंसा याचा प्रचार जगभर केला. वयाच्या ७२ व्या वर्षी महावीरांचे निधन झाले. जैन बांधव हे भगवान श्री महावीर यांच्या जन्म व निधनाच्या दिवशी घरोघरी दिवे लावतात. भगवान महावीर म्हणतात की, कळत नकळत देखील आपल्या हातून कोणाची हिंसा होणे हे अयोग्य आहे. त्याशिवाय दुसऱ्याच्या मार्फतही कोणाची हिंसा घडवून आणू नये किंवा कुठल्याही जीवांना मन, शरीर किंवा बोलण्याने दंडित करू नये अशी भगवान श्री महावीरांची शिकवण असल्याचे मोदी यांनी नमूद केले. सर्वांच्या आत एकच आत्मा आहे. आपल्या प्रमाणेच प्रत्येक प्राण्यांना आपापले प्राण प्रिय आहे त्यामुळेच कोणत्याही प्राण्यांप्रति हिंसा करू नये, स्वतः हिंसा करणारा, दुसऱ्यांकडून हिंसा घडवून आणणारा व दुसऱ्याने केलेल्या हिंसेचे समर्थन करणारा स्वतः प्रति द्वेष वाढवत असतो असेही भगवान श्री महावीरांचे मत होते अशी स्पस्टोक्ती राजकिशोर मोदी यांनी यादरम्यान दिली. सध्या सर्वत्र राजकीय तथा सामाजिक दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा वातावरणात भगवान श्री महावीरांची शांती तथा अहिंसेची शिकवण खऱ्या अर्थाने उपयोगी पडणार असल्याचे परखड मत राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

आपल्या स्वतःविषयी असणारा भाव अन्य प्राण्यांविषयी देखील असू द्यावा. सर्व प्राणिमात्रांविषयी अहिंसेचा भाव राखा. मन, वाणी आणि शरीराने कोणाचीही हिंसा न करणारा खरा संयमी म्हणून गणला जातो असे भगवान श्री महावीर म्हणत असत. स्वतःची पूर्ण खात्री झाल्याशिवाय, पाहिल्या व विचार केल्याशिवाय कृती करणाऱ्याकडून कळत नकळत हिंसा करतो असे भगवान श्री महावीर यांचे मत होते. दुःखास सर्वच जीव घाबरत असतात हे लक्षात घेऊन कोणत्याही जीवास कष्ट देणे किंवा ईजा पोचवणे टाळावे अशी शिकवण भगवान श्री महावीर आपल्या प्रत्येक प्रवचनातून देत असत असेही मत राजकिशोर मोदी यांनी यावेळी मांडले.

# शिवछत्र परिवाराने आणले गोदावरी नदी पात्रात पाणी



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१० एप्रिल**

गोदापट्ट्यातील शेतकरी व नागरिकांनी केलेल्या मागणीची दखल घेऊन जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांनी शासन दरबारी सातत्याने प्रयत्न केल्यामुळे गोदावरी नदी पात्रात नाथसागरातून पाणी सोडण्यात आले आहे. उन्हाळ्यात गोदावरी पात्र पाण्याने भरले असून जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक भाऊसाहेब नाटकर, मदन भुसारे यांच्यासह गोदापट्यातील सरपंच, पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी व नागरिकांनी माजी आमदार अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांचे आभार मानले आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, गोदाकाठच्या गावांमध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली होती. गोदावरी नदी कोरडी पडली होती. जनावरांसह नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. याबाबत जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांच्याकडे गोदाकाठच्या शेतकऱ्यांनी आपला प्रश्न मांडला होता. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर गंभीर दखल घेऊन अमरसिंह पंडित यांनी शासन दरबारी प्रयत्न करून हा प्रश्न चुटकीसरशी सोडवला आहे. जायकवाडी धरणाच्या पैठण उजव्या कालव्यातून गुळज येथील सी.आर. ३ व तळणेवाडी येथील सी.आर. ४ मधुन गोदावरी नदी पात्रात पाणी सोडण्यात आले आहे. यामुळे गेवराई व अंबड तालुक्यातील गोदाकाठच्या दोन्ही बाजुच्या शेतकरी व नागरीकांना या पाण्याचा फायदा झाला असून सर्व शेतकरी व नागरीकांनी आनंद व्यक्त केला आहे. गोदापटट्यातील नागझरी ख खामगाव, सावळेश्वर, राक्षसभुवन सुरळेगाव व ईतर सर्व शेतकऱ्यांच्या वतीने अमरसिंह पंडित साहेब व आ. विजयसिंह पंडित यांनी गोदावरी नदी पात्रात पाणी आणल्या बद्दल शेतकऱ्यांनी आनंद साजरा केला.

या बाबत माहिती देताना जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक भाऊसाहेब नाटकर म्हणाले की, लोकनेते अमरसिंह पंडित व आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून गोदापटट्यातील सर्व नागरिकाच्या वतीने फक्त गेवराई तालुक्यांच्या मागणीनुसार तेवढेच पाणी सुटले, जसे गेवराई तालुक्यातील नागरिकांनी प्रस्ताव दिले तसेच अंबड तालुक्यातील नागरीकांनी प्रस्ताव दिल प्रस्ताव दिले होते परंतु त्यांनी विहित नमुन्यात प्रस्ताव न दिल्याने जास्तीचे पाणी त्यांना मिळाले नाही. गेवराई तालुक्यातील मागणीनुसार तेवढेच पाणी सुटले. अंबड तालुक्यातील नागरिकाच्या मागनी प्रमाणे पाणी आले असते तर पाथरवाला परिसराला फायदा झाला असता. वाळकेश्वर संगमजळगाव अगरनांदर व हिंगणगाव या भागातील शेतकऱ्यांनी जसा प्रस्ताव पाहिजे होता तसा त्यानी दिला नाही या कारणानी अंबड तालुक्यातील नागरीकाची मागणी तसीच राहीली. पाहिजे त्या नमुन्यामधे प्रस्ताव दाखल केल्यामुळे ३ क्युबिक क्युसेक मिटर पाणी सुटले. अंबड तालुक्यातील नागरीकांचा प्रस्ताव आला असता तर ८ क्युसिक मिटर पाणी सुटले आसते आणि शहागडच्या बंधारावरुध पाथरवाला बंधारा पर्यंत पाणी आले आसते अशी प्रतिक्रिया जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक भाऊसाहेब नाटकर यांनी यावेळी दिली. गोदावरी नदी पात्रातील शहागड को.प.बंधाऱ्यांचे बॅरेज मध्ये रुपांतर करण्याची मागणी आपण आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या कडे केली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.







जैन धर्माचे चोवीसावे तीर्थकर भगवान महावीर यांच्या जयंती निमित्त बीड शहरात भव्य शोभा यात्रे आयोजन करण्यात आले होते. सुभाष रोड येथील अहिंसा चौक या ठिकाणी आज सर्वांनी भगवान महावीर यांना वंदन करून शोभायात्रा प्रारंभ झाली.

# गेवराईत जिल्हा वाहतुक शाखेची नियम मोडणाऱ्या वाहनधारकांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१० एप्रिल**

जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनखाली आज जिल्हा वाहतुक शाखेने गेवराई येथे नियम मोडणार्या वाहनधारकांवर कारवाई केली यावेळी ९३ केसेस आणि ६५ हजार रुपयांचा दंड वाहनधारकांना ठोठावला तसेच रोख ८ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.



याबाबत माहिती अशी की, बीड जिल्ह्यात पोलीस अधिक्षक नवनीत सर यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरु आहेत तसेच सरकारी नियमांचे पालन करण्यासाठी देखील नियम मोडणार्या वाहनधारकांवर जरब बसावा या करिता कार्यवाही सुरु आहे आज जिल्हा वाहतुक शाखेने मोटार वाहन कायद्या अंतर्गत गेवराई येथील शिवाजी चौक, बस स्टॅन्ड परिसर येथे जिल्हा वाहतुक शाखा आणि गेवराई वाहतुक शाखा ही जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विजय,गेवराई पोस्टचे पोलीस निरीक्षक प्रविण, पोलीस हवालदार शांतीलाल, दत्ता पोलीस आजिनाथ, पोलीस हवालदार पांडुरंग चालक पोलीस हवालदार राम पोलीस हवालदार नारायण गेवराई पोस्टचे पोलीस हवालदार विजय, किरण यांनी दुपारी ११ ते १ च्या दरम्यान गेवराईत विविध कलमांतर्गत लायसन्स नसणे, विमा नसणे, काळी काच, नो पार्किंग, ट्रिपलसीट या सदराखाली एकुण ९३ केसेस आणि ६५ हजार रुपयांचा दंड वाहनधारकांना ठोठावला तसेच रोख ८ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

## लक्ष्मण आण्णांच्या मार्गदर्शनखाली शिवराज पवारांच्या उपस्थितीत गेवराईत भाजपा स्थापनादिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१० एप्रिल**

देशातील सर्वात मोठा पक्ष म्हणून भारतीय जनता पक्षाला मतदारांनी पसंती दिले आहे त्या भारतीय जनता पक्षाचा आज ६ एप्रिल रविवार रोजी स्थापनादिन देशभरात व महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा होत असून भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे,कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण, ना.पंकजाताई मुंडे मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्या मार्गदर्शनात

आज गेवराई मतदारसंघातील मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली युवानेते शिवराज पवार यांच्या उपस्थितीत गेवराई येथील कोल्हेररोड वरील भारतीय जनता पक्षाच्या संपर्क कार्यालयात साजरा करण्यात आला





यावेळेस मा.नगराध्यक्ष ब्रम्हदेव धुरंधरे,मा.उपनगराध्यक्ष राजेंद्र राक्षसभुवनकर, दादासाहेब गिरी,मा.सभापती राहुल खंडागळे,भरत गायकवाड, आप्पासाहेब कानगुडे,राम पवार, किशोर धोडलकर, बद्दोदिन, लक्ष्मण चव्हाण, पिटु साळवे.दिलीप सोनवणे,शिवाजी काळे,बाबुराव गवारे, रजित खाजेकर, रजित कांबळे, गोरख मोटे,प्रमेश्वर राठोड,प्रल्हाद येळापुरे, दाऊद पठाण,दिपक पवार, अमोल हादगुले,शेख बाबा.मगन परदेशी, भगवान कदम,कृष्णा पाटोळे, श्रिराम घाटुळ, बालाजी जाधव, बबन जाधव, आदी उपस्थित होते

'राष्ट्र प्रथम' या भावनेने सुशासन आणी जनकल्याणासाठी समर्पित भारतीय जनता पक्षाचा झेंडा हा माझा अभिमान आणि प्रेरणा आज गेवराई शहरातील कोल्हेर रोड वरील भारतीय जनता पक्षाच्या संपर्क कार्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन युवानेते शिवराज पवार यांच्या उपस्थितीत केले होते

## महात्मा फुले-एक समाज सुधारक....



महाराष्ट्रमध्ये अनेक विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते ,समाजसुधारक यांचा वैचारिक वारसा लाभला ,त्यांच्या विचारांनी, कार्यांनी समाजाला प्रेरणा मिळाली. त्यापैकीच एक समाजसुधारक म्हणजे ज्योतिराव गोविंदराव फुले. विशेष म्हणजे जाती व्यवस्थेचे निर्मूलन ,अस्पृश्यता ,स्त्रियांना, मुलींना तसेच मागास जातींच्या लोकांना शिक्षण देण्याचे कार्य, गरीब, शोषितांच्या हक्कांसाठी अनेक चळवळी केल्या. पुण्यामध्ये भिडेवाडा येथे त्यांनी मुलींची पहिली शाळा काढली. आपल्या अनुयायांसह ' *सत्यशोधक समाजाची* 'स्थापना ज्याचा उद्देश समाजातील अन्याय आणि अनिष्ट रुढी विरुद्ध लढणे हा होता. शेतकऱ्यांचा हक्क आणि न्याय यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले . त्यामध्ये अनेक ग्रंथ लेखन जसे *'शेतकऱ्याचा आसूड*', गुलामगिरी , सार्वजनिक सत्यधर्म त्याचबरोबर पुण्यामध्ये *'दीनबंधू*' हे वर्तमानपत्र सुरू करून समाजाच्या विचारांना आवाज दिला त्यामधूनच समाजाला प्रबोधन आणि परिवर्तनाची नवीन वाट मिळाली आणि ती मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरली. महाराष्ट्रीयन सामाजिक कार्यकर्ते विठ्ठलराव कृष्णाजी वंडेकर यांनी ज्योतिराव फुले यांना *महात्मा*(महान असा आत्मा) ही उपाधी दिली जी त्यांच्या कार्याची आणि विचारांची ओळख बनली. आज महात्मा फुले यांची जयंती त्यानिमित्त त्यांच्या विचारांना आणि कार्याला विनम्र अभिवादन!

धन्यवाद
सौ .मनीषा वासुदेवराव टेकाळे (नाईक)

# पाणीदार गाव चळवळ ; फार्मर कप यशस्वी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१० एप्रिल-**

पाणीदार गाव या मोहिमेत सत्यमेव जयते ही फार्मर कप स्पर्धा गेल्या नऊ वर्षा पासून तालुक्यात राबविले जाते.यंदा पारडी महिला बचत गटाने पहिला क्रमांक पटकविला असून जलचळवळी च्या प्रनेत्या प्राणितताई देवरे चिखलीकर याच्या हस्ते फार्मर कप स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या बचत गटांच्या सत्कार करण्यात आला.सेंद्रिय शेतीचा प्रयोग राज्यात पथ दर्शी ठरवा अशी अपेक्षा प्राणितताई यांनी व्यक्त केली.

लोहा शहरातील बगडे कॉम्पलेक्स येथ शांतीदूत प्रतिष्ठान कंधार च्या वतीने सत्यमेव जयते फॉर्मर कप स्पर्धा शेती गट स्पर्धेत यशस्वी झालेल्या बचत गटांचा सत्कार सोहळा जलचळवळीच्या प्रनेत्या प्राणितताई देवरे चिखलीकर यांच्या पुढाकाराने घेण्यात आला.

प्रमुख पाहुणे म्हणून पाणी फाउंडेशन चे मराठवाडा समन्वयक संतोष शिनगारे,माजी नगराध्यक्ष किरण वटमवार, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकादम, माजी उपनगराध्यक्ष दता वाले, माजी नगरसेवक भास्करराव पाटील पवार, माजी नगरसेवक पंचशील कांबळे, माजी नगरसेविका शोभाताई बगडे, शिक्षक नेते हरीभाऊ चव्हाण, दिनेश तेललवार, डोंगरे मॅडम, पाणी फाऊंडेशनचे लोहा तालुका समन्वयक राजाभाऊ कदम, संतोष भिसे, अविनाश पवार उपस्थित होते.



फॉर्मर कप स्पर्धेत उत्कृष्ट कार्य करणारे लोहा तालुक्यातील प्रगती महिला शेतकरी गट पारडी, कृषी क्रांती महिला शेतकरी गट सोनखेड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महिला शेतकरी गट किरोडा,जय किसान महिला शेतकरी गट गोलेगाव (प.क.), संघर्ष महिला शेतकरी गट धानोरा मक्ता, हुतात्मा रघुनाथराव हंबर्डे शेतकरी गट टेळकी ,या गटशेती करणाऱ्या महिला बचत गटाच्या सत्कार प्राणितताई व मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

मार्गदर्शन करताना प्रणितताई देवरे - चिखलीकर म्हणाल्या की, लोहा तालुक्यातील पाणीदार गाव चळवळीत गेल्या सात वर्षा पासून मी सक्रिय आहे. स्वतः श्रमदान केले. ग्रामस्थांना प्रेरणा व मार्गदर्शन व्हावे गाव पाणीदार झाले पाहीजे त्यासाठी हा प्रयत्न असतो. सत्यमेवजयते या वॉटर कप मध्ये आपल्या तालुक्याने केलेली कामगिरी निश्चित प्रेरणादायी आहे. महिला बचत गटाच्या माध्यमातून गटशेती केली जातेय. येत्या काळात सेंद्रिय गट शेतीचा लोहा तालुका पॅटर्न राज्यात पथदर्शी झाला पाहिजे यासाठी जे की सहकार्य लागेल ते आम्ही देऊ तुम्ही प्रयत्न करा आमदार चिखलीकर व मी आपल्या सदैव सोबतआहोत असे प्राणितताई यांनी आश्वासित केले व गटशेती स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या महिलांचे त्यांनी कौतुक केले. यावेळी शिनगारे यांनी मार्गदर्शन केले संचलन व आभार भोसले यांनीं मानले.

# प्रगतीबरोबरच विद्यार्थ्यांनी आपल्यातील कलागुणांना वाव द्यावा : डॉ. मनेश कोकरे



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.१० एप्रिल-**

श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी येथे दिनांक ९ ते १२ एप्रिल २०२५ या कालावधीत विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी व नाट्य कलागुण विकसीत करण्यासाठी विशेष चार दिवसीय नाट्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या प्रसंगी डॉ. मनेश कोकरे यांनी आपले विचार मांडताना म्हणाले प्रगतीबरोबरच विद्यार्थ्यांनी आपल्यामधील कलागुणांना वाव दिल्यास सर्वांगीण विकास झाल्याशिवाय राहत नाही.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणाच्या विकासासाठी व नाट्य कलागुण विकसीत करण्यासाठी विशेष चार दिवसीय नाट्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.या कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांच्या हस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी नियामक मंडळाच्या सदस्या डॉ. जे. व्ही.मेघा, विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता प्रा. संजय देठे, गंधर्व ड्रम क्लबच्या समन्वयिका डॉ. ऊषा कांबळे व तसेच या कार्यशाळेचे मार्गदर्शक श्री.सृज्ञ टोंपे उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, शैक्षणिक प्रगतीबरोबरच विद्यार्थ्यांनी आपल्यामधील कलागुणांना वाव द्यावा. संवाद कौशल्य, आत्मविश्वास आणि प्रभावी सादरीकरण हे आजच्या युगात अत्यंत आवश्यक गुण आहेत, जे नाट्य शास्त्राच्या माध्यमातून विकसित करता येतात. त्यामुळे अशा कार्यशाळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास निश्चितच साधता येईल.

चार दिवस चालणाऱ्या या कार्यशाळेत राष्ट्रीय नाट्य विद्यालय, त्रिपुरा व एस.जी. जी.एस. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. सृज्ञ टोंपे हे प्रशिक्षण देत आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांना अभिनयाचे तंत्र, अभिव्यक्ती शैली, शरीरभाषा, संवादफेक आणि रंगभूमीवरील सादरीकरण याबाबत सखोल मार्गदर्शन करतील.

संस्थेतील विद्यार्थ्यांचा या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, या उपक्रमाचा समारोप १२ एप्रिल रोजी सायंकाळी होणार आहे. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी गंधर्व ड्रामा क्लबचे विद्यार्थी युवराज कौसडीकर, प्रद्युम्न धुळसे, शिवानी ठाकूर, अंजली दहापुते हे परिश्रम घेत आहेत.

## गणेश मंदिरात सत्कार सोहळा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१० एप्रिल-**

गणेश नगरमधील गणेश मंदिरामध्ये आ. बालाजी कल्याणकर यांच्या निधीतून पेव्हर ब्लॉक बसवण्यात आले आहेत. याचा लोकार्पण सोहळा तसेच आ. बालाजी कल्याणकर व संदीप कऱ्हाळे यांचा सत्कार सोहळा शनिवार, दि. १२ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता याच मंदिरात होणार आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून आ. बालाजी कल्याणकर हे उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन श्री गणेश मंदिर समितीने केले आहे.

# मुदखेड तालुका भाजपा कार्यकारणीत लवकरच बदल

## जुनी भाजप - नवीन भाजप पैकी कुणाची लागणार लॉटरी ?

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.१० एप्रिल-**

मुदखेड तालुका भाजप कार्यकारणी मध्ये बदलाचे वारे वाहू लागले आहेत. मुदखेड तालुक्यात निष्ठावंत विरुद्ध उपरे यांच्यात सूप्तपणे धुसपूस चालू असली तरी पाकीट बंद अहवालामुळे चमकोगिरी पुढाऱ्यांची गोची होणार असल्याची चर्चा तालुक्यात आहे. या परिस्थितीत मुदखेड तालुका भाजप अध्यक्षपदी दत्तू देशमुख वाडीकर,विलास पाटील कल्याणे, सतीश पा. मुंगल, मारुती किरकण, भीमराव पा.कल्याणे तर शहराध्यक्षपदी रामसिंग चव्हाण, माधव कदम,यांचे नाव आघाडीवर असल्याचे बोलले जात आहे.

परंतु शहराध्यक्ष पदासाठी जुने निष्ठावंत भाजपच्या कार्यकर्त्यांचाही समावेश दिसून येत आहे. इच्छूक मध्ये प्रभाकर (बाळू) पांचाळ, कानोबा बिसमिले,संजय (पप्पु) सोनटक्के,अमोल अबादार,संजय चव्हाण, अमोल आडकीने,यांचेही नावे शहराध्यक्ष पदासाठी इच्छुक असल्याची चर्चा जुन्या कार्यकर्त्यांमध्ये होताना दिसत आहे.

तालुक्यातील भाजप संघटन पुनर्रचनेसाठी मुंबईवरून आलेल्या निरीक्षकांनी सक्रिय असलेल्या तालुक्यातील ३१ सदस्यांशी चर्चा करून पाकीट बंद अहवाल तयार केला आहे. भाजपा तालुका अध्यक्ष पदासाठी भीमराव कल्याणे, विलास कल्याणे, सतीष मुंगल,दत्तू देशमुख वाडीकर, मारुती किरकण, मारोती जाधव तर शहराध्यक्ष पदासाठी रामसिंग चव्हाण, माधव कदम, अमोल आबादार, यांच्या नावाची अधिक चर्चा असून पाकीट बंद अहवालातून जुनी भाजप आणि नविन भाजप यामध्ये कुणास लॉटरी लागणार याची उत्सुकता भाजप कार्यकर्त्यांना आहे. राज्यसभा खा. अशोक चव्हाण यांचा नेमका कुणावर वरदहस्त आहे याचीही आस कार्यकर्त्यांना लागली आहे.

गतवर्षी खा. अशोक चव्हाण भाजपवासी झाल्यामुळे अनेक फोटोजीवी कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. मुदखेड तालुक्यात जिल्हा महामंत्री प्रवीण गायकवाड, तालुकाध्यक्ष बालाजी खटींग, शंकर मुतकलवाड, हनुमंत देशमुख, दिलीप देशमुख, मुन्ना चांडक, संजय सोनटक्के यांची तालुका कार्यकारणीच्या निवडीत महत्वपूर्ण भूमिका राहणार असून निष्ठावंत आणि नवीन भाजपा सदस्य यांच्यात समतोल साधूनच नव्या कार्यकारिणीची घोषणा होईल असे स्पष्ट संकेत दिसत आहेत. परंतु स्वतःचे घोडे पुढे करणाऱ्या कुठल्याही 'चमकोगिरी' करणाऱ्या कार्यकर्त्यांना पक्षाच्या कुठल्याच पदावर संधी दिली जाऊ नये हा एकसूर पाहावयास मिळाल्याने तालुका कार्यकारणी निवडीत खा. अशोक चव्हाण यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## संक्षिप्त वृत्त

### 'समता दिवस' उत्साहात साजरा

**नांदेड** -गुरु रविदास तिर्थक्षेत्र बळीरामपूर नांदेडच्या परिसरात असलेल्या स्वातंत्र्य सेनानी व देशाचे माजी उपपंतप्रधान मंत्री डॉ. बाबू जगजीवन राम यांच्या स्मारकास त्यांच्या ११८ व्या जयंती निमित्ताने दरवर्षीप्रमाणे यंदाही दि. ५ एप्रिल २०२५ रोजी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम माजी उपपंतप्रधान डॉ. बाबू जगजीवनराम यांच्या स्मारकास उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. सदर कार्यक्रमाला उपस्थित राहण्याकरीता राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, सर्व कॅबिनेट, राज्यमंत्री तसेच नांदेड जिल्ह्यातील तिन्हीही खासदार व सर्व आमदार व जिल्हा प्रशासनातील उच्चपदस्थ अधिकारी आदींना निमंत्रण देण्यात आले होते असे कार्यक्रमाचे आयोजक वामनराव विष्णुपूरीकर यांनी नमूद केले. यावेळी आनंदराव गुंडीले, इंद्रजित पांचाळ, नागोराव आंबटवार, किशनराव गव्हाणे, वामनराव विष्णुपूरीकर, अशोक लाठकर, डी.गा. पाटील, डॉ. विवेक पदमणे, इंजि. संजीव पांचाळ, गुंडप्पा बारोळे, प्रकाश सोनटक्के गुरफळीकर, गोविंद सोनटक्के, भगवान वाघमारे, तुळसाबाई लाठकर, विठ्ठलराव गोडबोले, अनिरुद्ध पवार, कन्हैय्याकुमार सोनकांबळे, दासरवाड यांच्यासह परिसरातील महिला- पुरुष, बालक- बालिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अनुसयाबाई गोणगोपले यांच निधन

**नायगाव** -बिलोली तालुक्यातील बोरगाव (थडी) येथील रहिवासी महीला अनुसयाबाई रामा गोणगोपले वय ६१ वर्ष यांच दि.१० एप्रिल २०२५ रोजी गुरुवारी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे. अनुसयाबाई गोणगोपले यांच्या पार्थिवावर दि.११ एप्रिल रोजी शुक्रवारी सकाळी ९ वाजता बोरगाव (थडी ) ता.बिलोली जि. नांदेड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगी, जावाई, नातू असा परिवार आहे. त्या तुकाराम पंदनवाड ऊंद्रीकर यांच्या बहीण होत तर माजी सरपंच प्रतिनिधी शिवाजी पंदनवाड यांच्या आत्या होत.





**लोहा- जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांची लोकनियुक्त नगराध्यक्ष गजानन सावकार सुर्यवंशी यांनी भेट घेऊन अनेक वर्षापासुन रेंगाळत आसलेल्या महत्वाचा विषय मार्गी लावला. शासनस्तरावर आसलेल्या महत्वाच्या विषयावर चर्चा केली. यावेळी माजी नगरसेवक युवराज वाघमारे, सुधाकर पाटील सातपुते यांची उपस्थिती होती.**

# मुदखेड येथील केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालयात शौर्य दिवस साजरा

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.१० एप्रिल-**

केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालयात दि.९ एप्रिल रोजी शौर्य दिन साजरा करण्यात आला. या दिवसाचे महत्त्व यावरून कळते की ०९ एप्रिल १९६५ रोजी केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या ०२ बटालियनच्या एका छोट्या तुकडीने गुजरातमधील रण ऑफ कच्छ मध्ये सरदार चौकीवर पाकिस्तानी ब्रिगेडचा हल्ला उधळून लावला. या हल्ल्यात ३४ पाकिस्तानी सैनिक मारले गेले आणि ०४ जणांना जिवंत अटक करण्यात आली. लष्करी लढाईच्या इतिहासात कधीही एका लहान सैन्याने पूर्णपणे सुसज्ज असलेल्या पायदळ ब्रिगेडशी अशा प्रकारे लढा दिला नव्हता. या संघर्षात सीआरपीएफच्या सात शूर योद्ध्यांनी आपले प्राण अर्पण केले. दलातील शूर सैनिकांच्या गाथेला श्रद्धांजली म्हणून, दरवर्षी ९ एप्रिल रोजी शौर्य दिवस साजरा केला जातो.



या प्रसंगी, संस्थेचे प्राचार्य सी.टी. पोलीस महानिरीक्षक वेंकटेश यांनी सकाळी ९:३५ वाजता शहीद स्मारकावर शहीदांना श्रद्धांजली वाहिली आणि क्वार्टर गार्ड येथे मानवंदना घेतली. त्यानंतर एक विशेष सैनिक संमेलन आयोजित करण्यात आले ज्यामध्ये वासुदेव, सहाय्यक कमांडंट, क/जीडी निलेश्वर, १२९ बटालियन. संस्थेच्या, ज्यांना शौर्यासाठी पोलिस पदक मिळाले होते, त्यांना सन्मानित करण्यात आले. हवालदार /जीडी सी मुर्गन, २४५ बटालीयन आणि हवालदार/जीडी विजय सिंह राठोड, २०७ कोब्रा बटालीयन यांना सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी, संस्थेने नांदेड जिल्हा आणि जवळच्या जिल्ह्यांतील सीआरपीएफ शहीदांच्या कुटुंबियांचा सन्मान केला, ज्यांनी देशाचे रक्षण करण्यासाठी कर्तव्य बजावताना आपले प्राण दिले. शहीद कॉन्स्टेबल चित्ते गजेंद्र, मुरताटे विलास पिराजी आणि राठोड गोविंद सिंग आणि लान्स नाईक पी.टी. या कार्यक्रमात खंदारे यांच्या कुटुंबियांचा सन्मान करण्यात आला. त्या शहीदांच्या शौर्याचे स्मरण त्यांना शाल आणि पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. लोकसभा निवडणूक-२०२४ निष्पक्ष आणि शांततेत पार पाडल्याबद्दल या संस्थेच्या १९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना विशेष प्रशंसा चकती आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. नंतर, सी.टी. पोलीस महानिरीक्षक/प्राचार्य व्यंकटेश यांनी उपस्थित असलेल्या सर्व अधिकाऱ्यांना, प्रशिक्षकांना आणि प्रशिक्षणार्थींना शौर्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि या घटनेपासून प्रेरणा घेण्याची विनंती केली.

या समारंभात, संस्थेचे कमांडंट वेदप्रकाश त्रिपाठी, उप. कमांडंट दीपक कुमार आणिअरुण कुमार यांच्यासह सर्व अधिकारी आणि कनिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# फुले - आंबेडकर संयुक्त जयंती निमित्त व्याख्यान

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.१० एप्रिल-**

शिव-शाहू-फुले-आंबेडकर-अण्णाभाऊ विचारमंच, किनवट तर्फे महात्मा ज्योतीबा फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती निमित्त शुक्रवारी व सोमवारी (दि.११ व १४ ) साने गुरूजी रुग्णालय सभागृहात प्रबोधनपर व्याख्यानाचे व अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवारी (दि.११) सायंकाळी ७ वाजता अहिल्यानगरचे प्रसिद्ध विचारवंत डॉ. सुधाकर शेलार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी आनंदराव वाढे हे करणार आहेत ,तर अध्यक्षस्थानी साने गुरुजी रुग्णालयाचे प्रमुख डॉ. अशोक बेलखोडे हे राहणार आहेत.

सोमवारी (दि.१४) सकाळी १०.३० ते १.३० या वेळेत प्रसिध्द कवी, कादंबरीकार श्रीकांत देशमुख हे विद्यार्थी व युवकांचा अभ्यासवर्ग घेतील तसेच सायंकाळी ६.०० ते ८.०० या वेळेत व्याख्यान देतील. या कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार भीमराव केराम हे राहतील,कार्यक्रमाचे उद्घाटन इसा खान, माजी नगराध्यक्ष हे करतील. उपस्थित राहण्याचे आवाहन शिव-शाहू-फुले-आंबेडकर-अण्णाभाऊ विचारमंचच्या वतीने करण्यात आले आहे. नांदेड जिल्हाधिकारी राहुलजी कर्डीले यांची लोकनियुक्त नगराध्यक्ष गजानन सावकार सुर्यवंशी यांनी कार्यालयात जाऊन भेट घेऊन अनेक वर्षापासुन रेंगाळत आसलेल्या महत्वाचा विषय मार्गी लावला शासनस्तरावर आसलेले महत्वाच्या विषयावर सखोल चर्चा केली यावेळी माजी नगरसेवक युवराज वाघमारे,सुधाकर पाटील सातपुते यांची उपस्थिती होती.

# महागाव येथील पंचमुखी हनुमान मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.१० एप्रिल-**

हनुमान जयंतीच्या पावन निमित्ताने शनिवार, (दि १२) रोजी महागाव येथे पंचमुखी हनुमान मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात पूजा, यज्ञ, अभिषेक व महाप्रसाद इत्यादी उपक्रम भाविक भक्तांसाठी संपन्न होणार आहेत.



ह्या सर्व विधी हनुमंत भक्त, साधक भोयर महाराज यांच्या हस्ते होईल जे की, राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ज्यांचे शिष्य आहेत. ज्यांच्या अनुष्ठान करिता मुंबई ते अनुष्ठान स्थळी वारंवार मोठमोठे नेते निरंतर प्रवास करत असतात व ज्यांनी दाव्याने हिंगोली तथा नांदेड लोकसभेचे खासदार घोषित केले होते असे हनुमंत भक्त तथा साधक भोयर महाराज यांच्या हस्ते संपूर्ण धार्मिक विधी संपन्न होणार आहेत. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ६:०० वाजता गजानन नगरी भागातील पंचमुखी हनुमान मंदिरात होणार असून मारुती भक्त संभाजी नरवाडे पाटील यांच्या हस्ते अभिषेक, पूजा, यज्ञ व आरती विधीपूर्वक पार पडणार आहेत. या ठिकाणी सर्व हनुमान भक्तांसाठी महाप्रसादाची विशेष देखील श्री कोपरकर परिवाराकडून करण्यात आलेली आहे. दिवसभर हनुमान भक्तांसाठी दर्शन व भेटीचा कार्यक्रम सुरु राहणार आहे. सर्व भाविक भक्तांनी या भक्तिमय कार्यक्रमात उपस्थित राहून हनुमान जयंती उत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन हनुमंत साधक भोयर महाराज साधक मंडळ व आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



**नांदेड- महावीर चौक येथे वर्धमान महावीर यांचा जयंती निमित्त आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी अभिवादन करून सर्व समाज बांधवांना वर्धमान महावीर यांच्या जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. सोबत माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष मोहसीन खान पठाण, प्रदेश सरचिटणीस कन्हैया कदम, नेताजी भोसले, पप्पू जाधव, रामराव शिंदे आदींची उपस्थिती होती.**

# पत्रकार मारहाण प्रकरणात प्रसार माध्यम हानी अधिनियम जोडण्याची मागणी

नांदेड- पत्रकार मारहाण प्रकरणात दाखल झालेल्या गुन्ह्यात प्रसार माध्यमातील व्यक्ती आणि प्रसार माध्यम संस्था हिंसक कृत्य व मालमत्तेचे नुकसान किंवा हानी अधिनियम २०१७ कलम ४ जोडावे अशी मागणी पत्रकार शेख याहिया यांनी एका निवेदनाद्वारे विशेष पोलीस उप महानिरीक्षकांकडे केली आहे. दिनांक २५ फेब्रुवारी रोजी सय्यद झहीर सय्यद युसुफ यांनी दिलेल्या तक्रारीवरून ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. परंतु यावेळी याठिकाणी वार्तांकणासाठी उपस्थित असलेल्या दैनिक नांदेड पुकारचा पत्रकार शेख आजार याला देखील लाथा - बुक्क्याने मारहाण करण्यात आली आहे. त्यामुळे या गुन्ह्यात प्रसार माध्यमातील व्यक्ती आणि प्रसार माध्यम संस्था ( हिंसक कृत्य व मालमत्तेचे नुकसान किंवा हानी अधिनियम २०१७ कलम ४ जोडावे तसेच अज्ञात आरोपी पैकी असलेला आरोपी हा शेख अफजल शेख मगदूम रा. देगलूर नाका येथील तर दुसरा आरोपी चांदसिंग करणार येथील घटनास्थळावर असलेल्या सीसी टीव्ही फुटेजमध्ये कैद झालेला आहे. दोन नावे माहीत नसलेल्या आरोपींची पत्रकार शेख अझहर यांच्या डोळ्यासमोर ओळख परेड घ्यावी असेही शेख याहीया यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# आंबेडकरी नेते सुरेश गायकवाड यांच आज व्याख्यान

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१० एप्रिल-**

येथील आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते सुरेश गायकवाड यांचे व्याख्यान आज शुक्रवार दि. ११ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आले असून महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त शहरातील हॉटेल विसावा पॅलेसच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये सायंकाळी सहा वाजता हे महत्वपूर्ण व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी येथील सुप्रसिद्ध विचारवंत तथा शैक्षणिक प्रश्नांचे अभ्यासक बालाजी थोटवे तर प्रमुख अतिथी म्हणून इंजि. के घनचक्कर, ओबीसी चळवळीतील कार्यकर्ते संतोष घटकार यांची उपस्थिती राहणार आहे, अशी माहिती आयोजन समितीच्या वतीने देण्यात आली.



भारतीय संविधान दिनाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त येथील भारतीय पिछडा शोषित संघटन, लसाकम आणि सप्तरंगी साहित्य मंडळाच्या संयुक्त विद्यमाने दरमहा एक अशा बारा व्याख्यानाचे आयोजन करण्यात येत आहे. या मालेत चार व्याख्याने संपन्न झाली असून म. फुले यांच्या जयंतीच्या औचित्याने 'म. फुले यांचे समतेचे तत्त्वज्ञान आणि भारतीय संविधान' या विषयावर ज्येष्ठ आंबेडकरी नेते सुरेशदादा गायकवाड हे पाचवे पुष्प गुंफणार आहेत. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# गोवंशाची वाहतुक करणारा टेम्पो पकडला

## ३ लाख ७५ हजारांचा माल ताब्यात

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि.१० एप्रिल-**

तालुक्यातील मरतोळी या मार्गाने टेम्पोमध्ये बेकायदेशीररित्या तीन गायी, वासरू घेऊन कत्तल करण्याच्या उद्देशाने घेऊन जात असताना मरखेल पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विलास पवार यांनी पकडल्याची घटना मरतोळी येथे घडली. या घटनेत गायी, टेम्पो असा एकूण मुद्देमाल तीन लाख ७५ हजारांचा माल जप्त करून मरखेल पोलीस ठाण्यात एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शनिवार बाजारात देगलूर तालुक्यातील गायी, बैल, म्हैस, शेळी आदी जनावरांचा मोठा बाजार भरला जातो. या ठिकाणी कर्नाटक, तेलंगणा तसेच महाराष्ट्र राज्यातून व्यापारी मोठ्या प्रमाणात येतात. देगलूर येथे व्यापाऱ्याने गायी खरेदी करून देगलूर ते मरतोळी या मार्गाने शनिवारी दुपारच्या सुमारास मरतोळी येथे घेऊन जात असल्याची माहिती मिळताच मरखेल पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विलास पवार यांनी गस्त घालण्यासाठी निघाले होते. या माहितीच्या आधारे मरतोळी परिसरात कत्तलीसाठी गायी घेऊन जाणारा टेम्पो येणार असल्याची माहिती मिळताच मरखेल पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विलास पवार, पोलीस कर्मचारी नारायण यंगाले तसेच मरखेल परिसरातील बजरंग दलाचे कार्यकर्त्यांनी अशोक लेलँड टेम्पो पकडला. या टेम्पोमध्ये तीन गायी-वासरू आढळून आल्याने त्या टेम्पोची चौकशी केल्यानंतर बिगरपास परमिट विनापरवाना वाहतूक करीत करून कत्तल करण्याच्या उद्देशाने घेऊन जात असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी वाहन ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणून वाहन टेम्पोचालक आरोपी इमाम आमदसाब शेख. रा केदारकुंटा ता. देगलूर याच्या विरुद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असुन सहाय्यक पोलीस निरीक्षक हुडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी पार पडली.पोलीस उपनिरीक्षक विलास पवार यांच्या दमदार कामगिरीचे सर्वत्र कौतुक केलं जातं आहे.

# जिल्ह्यातील रुग्णांना उत्तम आरोग्यसुविधा उपलब्ध करून देणार -पालकमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे

**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी:-** जिल्ह्यातील सर्व नागरिकांचे आरोग्य सदृढ ठेवण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग सदैव कार्यतत्पर असून, रुग्णांना उत्तम आरोग्यसुविधा उपलब्ध करून देणार असल्याची ग्वाही राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर- साकोरे यांनी आज सेलू येथे दिली. तीन दिवसीय सेवा संकल्प शिबिराच्या समारोपप्रसंगी त्या व्यासपीठावरून बोलत होत्या. यावेळी उपविभागीय अधिकारी संगिता सानप, शासकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सदानंद भिसे, कार्यकारी संचालक महावितरण (प्रकल्प) धनंजय औंढेकर, नांदेड परिमंडळाचे मुख्य अभियंता राजाराम माने, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राहुल गिते, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. कल्याण कदम आदी उपस्थित होते. शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच शासकीय विभाग अधिक लोकाभिमुख करण्याकरीता दि. ८ ते १० एप्रिल २०२५ या कालावधीत सेवा संकल्प शिबिराचे आयोजन सेलू येथील नूतन महाविद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले होते. सद्यस्थितीत या सेवा संकल्प शिबिरामध्ये तब्बल सहा हजारावर रुग्णांनी नावनोंदणी केली असून, येथे आलेल्या प्रत्येक रुग्णाच्या आजाराचे निदान करून त्यांच्यावर उपचार करण्यात येतील. रोगाचे निदान करताना एकही रुग्ण आरोग्य सेवांपासून वंचित राहणार नाही. मोतीबिंदू तसेच कर्करोगाचे निदान वेळीच करून घ्यावे. त्यासाठी वेळीच प्राथमिक चाचणी करून घ्यावी. सर्वांनी तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन करणे टाळावे, असे आवाहन करत पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या की, रुग्णांनी कर्करोगाची वेळेवर चाचणी, निदान व उपचार केल्यास सर्व नागरिक सदृढ राहतील, कोणतीही जीवितहानी होणार नाही. ती टाळता येईल, यासाठी आपण सर्वजण काम करूयात, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. जिल्ह्यात रुग्णांना डायलिसिस सेंटरच्या माध्यमातून सर्व अत्याधुनिक आरोग्य सेवा सुविधा उपलब्ध करून देणार असून, त्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सर्व केंद्रांवर डॉक्टर, परिचारिका, आरोग्य कर्मचारी हे उत्कृष्ट सेवा पुरवतील. बोरी आणि जिंतूर येथील ३० बेडच्या रुग्णालयाला १०० बेडचे रुग्णालय करण्यासाठी प्रयत्न करत आहोत. तसेच जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार असून, येथे कॅन्सर रुग्णालय सुरु करण्याचा मानसही पालकमंत्र्यांनी बोलून दाखविला. यावेळी पालकमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे यांनी सेवा संकल्प शिबिर कार्यक्रम ठिकाणी विविध स्टॉल्सना भेटी दिल्या. तसेच आरोग्य शिबिराच्या ठिकाणी भेट देत रुग्णांची विचारपूस केली. तसेच पालकमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देण्यासाठी पदाधिकारी-नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. कार्यकारी संचालक महावितरण (प्रकल्प) धनंजय औंढेकर यांनी प्रधानमंत्री सूर्यघर योजनेची यावेळी सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले की, वीजबिल कमी येण्यासाठी व स्वच्छ पर्यावरणाकरीता सूर्यघर योजना अतिशय चांगली आहे. विशेषत: या योजनेसाठी सबसिडी दिली जाते. प्रत्येकाने आपल्या घरावर या योजनेच्या माध्यमातून सोलार पॅनल लावून सौर ऊर्जेचा वापर करावा. घरातील सर्व उपकरणे या ऊर्जेवर चालतात.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी योजनेच्या संकेतस्थळावर जाऊन अवश्य नोंदणी करण्याचे आवाहन त्यांनी केले. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून सेवा संकल्प शिबिराच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. यावेळी बचतगटांच्या महिलांसह शहर व ग्रामीण भागातील नागरिक, तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. शासनाच्या विविध विभागांचे स्टॉल या ठिकाणी असून त्या माध्यमातून लोकाभिमुख योजनांची माहिती नागरिकांनी दिली जात आहे. तसेच बचतगटाचे स्टॉलही येथे आहेत. सर्वच स्टॉलवर माहिती घेण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.




## दुधगाव सौर उर्जा प्रकल्पाचे ई-लोकार्पण सोहळा

**जिंतूर तालुक्यातील दुधगाव येथे महावितरणकडून ४ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्पद्वारे तयार होणारी हरित ऊर्जा ३३/११ केव्ही दुधगाव उपकेंद्रशी जोडली गेली आहे. त्यामुळे उपकेंद्रातून दुधगाव, असेगाव आणि कौडगाव या गावातील एकूण ३९४ कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास दर्जेदार व योग्य दाबाने विद्युत पुरवठा होत आहे. या प्रकल्पाचे पालकमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे यांच्या हस्ते आज ई-लोकार्पण करण्यात आले. तसेच प्रधानमंत्री सुर्यघर योजनेतील लाभार्थ्यांना त्यांच्या हस्ते लाभाचे वाटप करण्यात आले.**

**यावेळी पालकमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सेवाभावी संस्थाकडून चार हजार दिनदर्शिका आणि सुंदर माझी अंगणवाडीला चार हजार वह्यांचे यावेळी वाटप करण्यात आले. तर गंगाखेड उपजिल्हा रुग्णालयाचा मोठ्या शस्त्रक्रिया करण्यामध्ये राज्यातूर द्वितीय क्रमांक आल्याबद्दल त्यांनी कौतुक केले.**



## शेकहॅन्ड फाउंडेशन तर्फे निराधार महिलांना साहित्य वाटप-पालकमंत्री मेघना बोर्डीकर

**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी-** सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणाऱ्या शेकहॅन्ड फाउंडेशनच्या वतीने जिल्ह्यातील निराधार महिलांना गिरणी,शेळी,शिलाई मशीनचे वाटप पालकमंत्री तथा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त अनोख्या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आजकाल वाढदिवस म्हटलं की सोशल मीडियाच्या माध्यमातून विविध पोस्टद्वारे,बॅनरबाजी करून अथवा पद्धतीने साजरा करतात.परंतु या सर्व गोष्टीला फाटा देऊन शेक हॅन्ड फौंडेशन चे सागर शिंदे यांनी पालकमंत्री परभणी तथा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनातून पाच निराधार महिलांना उदरनिर्वाहाचे साधन दिले. सर्व साधने महिलांना त्यांच्या मागणीनुसार देण्यात आली.यामध्ये कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी साधने मोफत वाटप करण्यात आले.यावेळी भोगाव व मानधनी येथील निराधार महिलांनी त्यांना घरकुल नसल्याचे सांगितले त्यावेळी मेघना बोर्डीकर यांनी तात्काळ घरकुल मंजूर करून प्रस्ताव पाठवण्याचे यांना सांगितले. यावेळी सर्व महिलांना व त्यांच्या मुलांना कपडे देखील देण्यात आले.सदरील कार्यक्रमासाठी एन.डी. देशमुख व सेलू येथील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.यावेळी शेक हॅन्डच्या सागर शिंदे,श्री के बा विद्यालयातील जेष्ठ शिक्षक संजय धारासूरकर,दिलीप बेदरकर,नरेंद्र झालटे,कृष्णा पांचाळ,विकास पांचाळ,परमेश्वर सिराळ,शरद लोहट आदींनी परिश्रम घेतले.

## पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप- रमेश दरगड

**जिंतूर,/प्रतिनिधी-** नामदार पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप/रमेश दरगड

जिंतूर प्रतिनिधी,- परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या संकल्पनेतून वाढदिवसानिमित्त अवाढव्य खर्च न करता समाज उपयोगी कामे करा असे संकल्पना मांडली होती त्यामुळे तालुका व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रमेश दरगड यांच्या वतीने कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय येथील मुलींना शालेय साहित्य वाटप करण्यात आले आहे.

नामदार तथा पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी संकल्प घेतला होता कि माझ्या वाढदिवसाला समाज उपयोगी कामे करा म्हणून तालुका व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रमेश दरगड यांच्या पुढाकाराने शहरातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय येथील मुलींना शालेय साहित्य वाटप करण्यात आले यावेळेस अनेक मुलींनी समाधान व्यक्त केले या कार्यक्रमाला माजी नगराध्यक्ष प्रताप देशमुख, तालुकाध्यक्ष गोविंद थिटे पाटील, माजी नगरसेवक एड गोपाळ रोकडे, युवा नेते, युवा उद्योजक बालाजी सांगळे पाटील, सरपंच संदीप लकडे,एड सुनील मते, पिंटू महाजन, गंगाधर तरटे आप्पा, मनोज तोडकर, शाळेच्या मुख्याध्यापिका आदींची उपस्थिती होती.



## संक्षिप्त वृत्त...

### जयभीम पँथर'' चित्रपटातून अतुल साळवे यांचे अभिनय क्षेत्रात पदार्पण

**परभणी,/प्रतिनिधी :** नवयान ड्रीम फिल्म प्रोडक्शन निर्मित 'जयभीम पँथर.. एक संघर्ष' या चित्रपटाच्या माध्यमातून नाट्य लेखक तथा दिग्दर्शक अतूल साळवे हे अभिनय क्षेत्रात पदार्पण करीत .

सामाजिक विषयावर असलेला 'जयभीम पँथर.. एक संघर्ष' हा चित्रपट ११ एप्रिल रोजी संपूर्ण ट प्रदर्शित होत . या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन निशांत नाथाराम धापसे यांनी केले . यापूर्वी त्यांनी हलाल, भोंगा, अंकुश, फंटर इत्यादी चित्रपटाचे दिग्दर्शक व लेखन केले . या चित्रपटात सुप्रसिद्ध अभिनेते शशांक शेंडे, मिलिंद शिंदे, जयवंत वाडकर गौरव मोरे, चिन्मय उदगीरकर, प्रवीण डाळिंबकर, विनय धाकडे आणि सोनाली ट मुख्य भूमिकेत दिसणार . या चित्रपटासाठी परभणीतील नाट्यकर्मी वर्षा जोशी, कमलकिशोर जयस्वाल, डॉक्टर सिद्धार्थ मस्के, नइम शेख, मधुकर उमरीकर इत्यादी कलावंत या फिल्म मध्ये दिसणार . ही फिल्म ११ एप्रिल २०२५ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार . या चित्रपटाचे संगीत व पार्श्वसंगीत रोहित नागभिडे यांचे . अतुल साळवे यांनी या अगोदर नाट्य लेखक, दिग्दर्शक, अभिनेते म्हणून राज्य स्तरावर आपली ओळख निर्माण केलेली आहे व 'प्रीत अधुरी' या चित्रपटाचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केले . आता जयभीम पँथर या फिल्मच्या माध्यमातून अतुल साळवे चित्रपटात अभिनयाच्या क्षेत्रात पदार्पण करीत . सर्वांनी हा चित्रपट चित्रपटगृहात जाऊन बघावा, असे आवाहन अतुल साळवे यांनी केले .

### मध्यवस्तीत अतिक्रमण विरोधी मोहीम सुरुच

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिका हद्दीतील मध्यवस्तीतील काही भागात अतिक्रमण विरोधी विभागाद्वारे अतिक्रमण हटविण्याची मोहिम सोमवारी सकाळपासून पुन्हा सुरु करण्यात आली.

या मोहिमेतून प्रभाग समिती अ अंतर्गत धार रस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्यात आली. पाठोपाठ नाल्या आणि रस्त्याची साफसफाई करण्यात आली. मध्यवस्तीतील ग्रॅन्ड कॉर्नर भागात मार्कींग करण्यात आले. रस्त्यावरच दुकाने थाटलेल्या पाच दुकानदारांकडून १५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. प्रभाग समिती ब चे सहाय्यक आयुक्त सोमनाथ बनसोडे यांच्या पथकाने कडबी मंडी परिसरातील नाल्यावरील अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली. तसेच डिग्गी नाला साफसफाईचे काम सुरु केले. प्रभाग समिती क च्या सहाय्यक आयुक्त प्रिया गोरखे यांच्या मार्गदर्शनाखाली धार रस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्यात आली. तर मध्यवस्तीतील डॉक्टर लेन व एसबीआय बँके समोरील अतिक्रमणेही काढण्यात आली.

, अतिक्रमणकर्त्यांनी स्वतःहुन अतिक्रमणे हटवावीत, अन्यथा त्यांच्या विरोधात कठोर भूमिका घेतली जाईल, असा इशारा महापालिका प्रशासनाने दिला .

### पाण्याचे जतन करणे काळाची गरज : ॲड. भोसले

**पूर्णा,/प्रतिनिधी :** मानवी जीवनासाठी पाणी अत्यंत आवश्यक असून पाण्याचे जतन करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन ॲड. नितीन भोसले यांनी केले.

येथील स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयाच्यावतीने 'स्थानिकांसाठी कार्यक्रम' या उपक्रमांतर्गत मौजे शिरकळस येथे गावकऱ्यांसाठी 'पाणी आडवा पाणी जिरवा' या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . त्याप्रसंगी ते बोलत . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच माणिकराव भोसले यांच्यासह तंटामुक्तीचे अध्यक्ष बबनराव भोसले, प्रयोगशील शेतकरी भागवतराव भोसले, सचिन भोसले, रावसाहेब भोसले, कृष्णा भोसले, अनंता भोसले तसेच तामकळस येथील बाजीराव तनपुरे, बालाजी तनपुरे आदी मान्यवर उपस्थित .

यावेळी बोलतांना ॲड. भोसले म्हणाले की, शेतीसाठी पाण्याचे योग्य नियोजन करून नदी नाल्यावर छोटे छोटे बंधारे बांधले पाहिजे. जेव्हा पाणी मोठ्या प्रमाणात उपलब्ध असते तेव्हा त्याचे संवर्धन करणे हे सर्वांचीच जबाबदारी . पावसासाठी जास्तीत जास्त वृक्ष लागवड करून त्याचे संगोपण केले तरच वृक्ष संवर्धन होईल व पावसाचे प्रमाण वाढेल. पाण्याचे संवर्धन करणे हे मानवी जीवनासाठी अत्यावश्यक असून भविष्यात मानवासाठी पाणी हीच मोठी संपत्ती असणार आहे, असे ते म्हणाले.

### असोला येथील शेतकऱ्याची आत्महत्या

**परभणी,/प्रतिनिधी :** सततची नापिकी आणि बँकेच्या कर्जाला कंटाळून असोला येथील एका शेतकऱ्याने राहत्या घरी दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली.

परभणी तालुक्यातील आसोला येथील शेतकरी सुभाष पुरभाजी भरोसे (वय ३४ वर्षे) यांच्या नावाने आसोला शिवारात ५३९ गट नंबरमध्ये एक एकर शेती असून या त्यावर ट ग्रामीण बँक शाखा असोला या बँकेचे कर्ज . सततची नापिकी व बँकेचे हे कर्ज कसे फेडावे? या विवंचनेतून त्यांनी सोमवारी (दि. ७) सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी पत्राच्याखालील लोखंडी पाईपला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली.

घटनेची माहिती मिळताच ताडकळस पोलीस सहाय्यक पोलिस निरिक्षक गजानन मोरे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक शिवकांत नागरगोजे, पोलीस जमादार आप्पाराव वऱ्हाडे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी करून पंचनामा केला व मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी परभणी येथील सरकारी दवाखाना येथे पाठविला. रमेश भरोसे यांच्या फिर्यादीवरून ताडकळस पोलीस ठाण्यात भारतीय नागरी संरक्षण संहिता कायद्यान्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली .

, मयत शेतकरी सुभाष भरोसे यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी, एक मुलगा, मुलगी असा परिवार .

### प्रा. डॉ. अनंत राऊत यांचे आज व्याख्यान

संविधानाचा अमृत महोत्सवानिमित्त महापालिकेद्वारे आयोजन

परभणी,दि.०७(प्रतिनिधी) : संविधानाचा अमृत महोत्सवानिमित्त महापालिकेच्यावतीने बुधवार ९ एप्रिल रोजी प्रसिध्द व्याख्याते प्रा. डॉ. अनंत राऊत यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले .

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती दारू मुक्त साजरी करा- केदार

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** दि. ९ एप्रिल रोजी शहरात फुले शाहू आंबेडकर विचार मंच व भोर बंजारा समाज बांधवांच्या वतीने महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त उत्सव समिती आयोजक शरद सुदामराव चव्हाण आणि सजय रामराव आडे याच्या पुढाकाराने पार पडला या कार्यक्रमाचे अध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपकभाई केदार, संतोष चव्हाण प्रस्तुत स्वरादर्श संगीत रजनी यांचा याचा समाजप्रबोधनपर गीत गायनाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला.

सर्वप्रथम कालवश भीमशाहिर उमाकांत बन्ड याना समस्त जिंतूर वासियाच्या वतिने दोन मिनिट स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष:- दिपकभाई केदार आल इंडिया पँथर सेना महाराष्ट्र, कार्यक्रमाचे उद्घाटक लक्ष्मणराव (दादा) बाबाराव बुधवंत- संस्थापक अध्यक्ष:- संत भगवान बाबा युवक संघटना महाराष्ट्र राज्य, कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष:- ॲड.मनोज कन्हैयालाल सारडा साहेब (जेष्ठ विधिज्ञ जिंतूर),कार्यक्रमास विशेष उपस्थिती डॉ.इरफान खान अगाई पटेल, गुणीरत्न लक्ष्मणराव वाकोडे (पत्रकार),गजानन वराड जिल्हाध्यक्ष पुण्य श्लोक युवक संघ, परभणी, दत्ताभाऊ तानाजीराव काळे (अध्यक्ष समता परिषद जिंतूर),प्रीतम दादा वाकळे अध्यक्ष रिपब्लिकन युवा सेना,जिल्हा परभणी, अविनाशजी काळे वरदराज कंट्रक्शन जिंतूर, गटविकास अधिकारी सुभाषजी मानकर पंचायत समिती जिंतूर,शेख शकील अहेमद बबलू भैया तालुकाध्यक्ष मराठी पत्रकार संघ जिंतूर,भागवत लक्ष्मणराव चव्हाण तालुकाध्यक्ष व्हॉइस ऑफ मीडिया, जिंतूर, मंचकराव कैलासराव देशमुख तालुकाध्यक्ष प्रेस क्लब, जिंतूर प्रमुख उपस्थिती सतिष भगवानराव वाकळे, युवा जिल्हा महासचिव वंचित बहुजन आघाडी, परभणी शिवाजीराव भिकाजीराव वाघ मुख्याध्यापक ज्ञानेश्वर विद्यालय, जिंतूर,नामदेव प्रधान,बळीराम उबाळे, रावसाहेब हरभरे,बालाजी सैनिक शिंदे जिल्हाध्यक्ष संभाजी ब्रिगेड राजकीय खुशाल प्रल्हादराव घुगे, शिवाजी लाटे,महेश बाबाराव देशमुख साई कॅम्पुटर हुतात्मा स्मारक, जिंतूर,शकुराव बाबा घनसावंत,सुशीलाबाई घनसावंत, कार्यक्रमाचे विशेष सत्कारमूर्ती वसंतराव रामभाऊ राठोड घागरेकर तथा माजी पंचायत समिती उपसभापती जिंतूर, के.सी. घुगे सर आदर्श शिक्षक यांचा सत्कार मान्यवरांच्या व आयोजक शरद सुदामराव चव्हाण संजय रामराव आडे वतीने करण्यात आला कार्यक्रमाचे सुत्रसंचलन खुशालराव मुंढे सर संत भगवान बाबा माध्यमिक आश्रमशाळा शाळा ईटोली यांनी केले तर आभार प्रदर्शन आयोजक शरद चव्हाण व संजय आडे यानी केले.

